जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जात पडताळणी वैधता प्रक्रियेमध्ये अनियमित्ता, भ्रष्टाचार व गैरवर्तन; चौकशी करून कारवाई करा अन्यथा २३ जून रोजी उपोषण करणार



नगर – जात पडताळणी समितीतील अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील जात वैधता प्रक्रियेमध्ये गंभीर अनियमित्ता, आर्थिक भ्रष्टाचार व गैरवर्तन होत असल्याने चौकशी करून कारवाई करण्याच्या मागणीसाठी मानव विकास परिषदेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष अफसर शेख यांनी निवेदन दिले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर येथील जात पडताळणी समितीत कार्यरत असलेले काही अधिकारी व कर्मचारी शासन नियमाला ठेंगा दाखवत, वर्षानुवर्षे एकाच पदावर काम करत आहेत. शासन नियमाप्रमाणे एकाच ठिकाणी तीन वर्षाहून अधिक काळ कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती असणे हा नियमभंग असून, त्यातूनच मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, पक्षपाती निर्णय व आर्थिक लाचखोरीच्या प्रकारांना चालना मिळाल्याचे पुराव्यांसह आढळून आले आहे. एकाच कुटुंबातील एका सदस्यास जातीचा दाखला देण्यात आला असून त्याच कुटुंबातील दुसऱ्या सदस्याचा अर्ज फेटाळण्यात आला आहे. ही बाब जात वैधता प्रक्रियेतील एकांगी व पक्षपाती वागणुकीचे स्पष्ट उदाहरण आहे.

ठोस व कागदोपत्री पुरावे सादर करणाऱ्या अर्जदारांचे अर्ज हेतुपुरस्सर नाकारण्यात आले आहेत तर अपुरे पुरावे असणाऱ्यांना ग्रहचौकशीच्या आधारावर बिनधास्त प्रमाणपत्रे दिली गेली आहेत. या मागे आर्थिक देवाणघेवाण किंवा सामाजिक पक्षपात असण्याची शक्यता गंभीरपणे तपासली पाहिजे. विभागातील अधिकारी व कर्मचारी तीन वर्षाच्या मर्यादेपेक्षा जास्त काळ एकाच टेबलवर कार्यरत आहेत. यांची बदली का झाली नाही, जर बदलीचे आदेश निघाले असतील तर त्यांनी पदमुक्त का घेतली नाही याचा शोध घेणे अत्यावश्यक आहे. या अधिकाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी संपादित केलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेची सखोल चौकशी व्हावी त्यांच्या घोषित उत्पन्नाच्या पलिकडे संपत्ती आढळल्यास त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत तसेच समितीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यकाळाची खात्री करुन, तीन वर्षाहुन अधिक काळ कार्यरत असलेल्यांची तातडीने बदली करण्यात यावी व जात प्रमाणपत्र प्रक्रियेत झालेल्या गंभीर अनियमित्तेबाबत स्वतंत्र चौकशी समिति नेमून, दोषीवर फौजदारी स्वरुपाची शिस्तभंग कारवाई करण्यात यावी. ज्यांचे अर्ज चुकीच्या पध्दतीने नाकारण्यात आले आहेत यांची केस–टू–केस पुनर्तपासणी करुन त्यांना न्याय मिळावा. विशेष चौकशी नेमून कॉल रेकॉर्डस व कार्यकाळ, मालमत्ता व प्रशासनिक वर्तणूक या सर्व मागणीची चौकशी करण्यात यावी अन्यथा २३ जून रोजी अहिल्यानगर जात पडताळणी समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...






### विज्ञानाला साद सरस्वतीची...

**हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड ।**
**तरी आता अवधानामृते वाड । सिंपोनि की जो ।।**

एक आध्यात्मिक ज्ञान व दुसरे विशेष ज्ञान. आध्यात्मिक ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, अद्वैत. विशेष ज्ञान म्हणजे विज्ञान. सारी मानवजात माझी आहे, त्यांची सेवा करावयास मला दोन्ही हातांनी चांगली कर्मे करावी लागतील. यासाठी विज्ञानाची गरज आहे.

विज्ञानाने भौतिक सुख प्राप्त होते परंतु भौतिक सुख म्हणजे संपूर्ण जग नव्हे. भौतिकाचा भोग, उपयोग करण्यासाठी सूक्ष्म ज्ञानाची गरज असते. हे सूक्ष्म ज्ञान सद्‌गुणांच्या विकासाने म्हणजेच सारस्वताच्या विकासाने मिळते.

७५० वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांनी 'भावार्थ दीपिके'तून हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे तत्त्वज्ञान एका बाजूने विज्ञानवादी तर दुसऱ्या बाजूने प्रतिभावादी, स्फूर्तीवादी, आत्मवादी आहे. यासंदर्भात सानेगुरुजी म्हणतात,

''विज्ञानाशिवाच ज्ञान निरुपयोगी आहे आणि ज्ञानाअभावी विज्ञान भेसूर आहे.'' ज्ञानाच्या पायावर विज्ञानाची इमारत उभारणे आवश्यक आहे.

सारस्वताविषयी आपल्या अतीव श्रद्धा व्यक्त करतांना विनोबाजी भावे म्हणतात, ''विज्ञान व आत्मज्ञान याहून श्रेष्ठ अशी जगाची जडणघडण करणारी शक्ती म्हणजे 'सारस्वत' होय.''

मानवाच्या जीवनाला आकार देणाऱ्या विज्ञान, आत्मज्ञान व सारस्वत या तीन शक्ती आहेत.

विज्ञान ही मानवाच्या जीवनाला रूप देते. आत्मज्ञान जीवन परिवर्तन करते तर सारस्वत मानवाला पूर्णत्व देते. याची साक्ष वाल्मिकी, व्यास, ज्ञानेश्वर, शेक्सपियर, होमर, रविंद्रनाथ यांच्यासारख्या महान साहित्यिकांच्या साहित्यातून मिळते. परमेश्वराचे रौद्र रूप प्रकटवण्याचे सामर्थ्य विज्ञानात आहे. आत्मज्ञान देणारे संतमहात्म्ये लोकजीवन कलाटणी देऊन टाकतात तर साहित्य सरळ हृदयाला हात घालते.

विज्ञानाला साद सरस्वतीची मिळाल्यास मानवतेच्या अधःपतनापासून मानव वाचवता येईल.

**संदर्भ : प्रा.डॉ. सुधा पेशकर**

# कोठला, मुकुंदनगर येथील दुकानांवर पोलिसांचे छापे; २२० किलो गोमांस जप्त

## गोमांससह साहित्य जप्त, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल

नगर – जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर गोमांस विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार तोफखाना पोलिसांनी कोठला झोपडपट्टी येथे तर भिंगार कॅम्प पोलिसांनी मुकुंदनगर येथील गोमांस विक्री दुकानांवर छापे टाकत गोमांस सह साहित्य जप्त करत दोघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तोफखाना पोलिसांनी कोठला झोपडपट्टी येथे एका शेडमध्ये छापा टाकला असता तेथील इसम तरबेज कुरेशी याच्या ताब्यातून ४४ हजार रू. किमतीचे २२० किलो गोमास, वजन काटा, सत्तूर असा एकूण ४६ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पो.नि.आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस अंमलदार सुनील चव्हाण, सुनील शिरसाठ, वसीम खान पठाण, योगेश चव्हाण, अहमद इनामदार, भानुदास खेडकर, सुधीर खाडे, सुमित गवळी, सतीश त्रिभुवन, सुजय हिवाळे, महेश पाखरे, सागर साबळे, भागवत बांगर यांनी केली आहे.

दुसरी कारवाई भिंगार कॅम्प पोलीसांनी मुकुंदनगर येथे केली, मुकुंदनगर येथील छोटी मरियम मस्जिद समोरील गाळ्यात गोमास विक्री चालू असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला असता तेथील इसम गुफरान मोहम्मद कुरेशी (वय. ३७, रा. बेपारी मोहल्ला, झेंडीगेट अ.नगर) यास ताब्यात घेऊन याच्या ताब्यातून ८ हजार ७५० रुपये. किमतीचे ३५ किलो गोमास, १ हजार ५० रुपयाचा लोखंडी वजन काटा, २०० रुपये किंमतीचा सत्तूर व एक छोटा चाकू असा एकूण १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार रवींद्र टकले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुफरान कुरेशी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी अनिल मोहिते



नगर – भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशातील संघटनात्मक जिल्ह्यांकरिता पूर्वी घोषित न झालेल्या उर्वरित जिल्हाध्यक्ष पदांची घोषणा प्रदेश निवडणूक अधिकारी आ. चैनसुख संचेती यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

कोकण :– १. पालघर– भरत राजपूत. २. वसई विरार– श्रीमती. प्रज्ञा पाटील. उ. महाराष्ट्र :– ३. अहिल्यानगर शहर– अनिल मोहिते. ४. नाशिक शहर– सुनील केदार. ५. नाशिक दक्षिण– सुनील बच्छाव. ६. नाशिक उत्तर– यतीन कदम. प. महाराष्ट्र :– ७. पुणे दक्षिण (बारामती)– शेखर वढणे. ८. कोल्हापूर शहर– विजय जाधव. विदर्भ :– ९. गडचिरोली– रमेश बारसागडे. १०. चंद्रपुर शहर– सुभाष कासमगुट्टवार. ११. चंद्रपूर ग्रामीण– हरिष शर्मा १२. वर्धा– संजय गाते. मराठवाडा :– १३. परभणी ग्रामीण– सुरेश भुबरे. १४. छत्रपती संभाजीनगर शहर– किशोर शितोळे. १५. लातूर शहर– अजित पाटील कव्हेकर. १६. लातूर ग्रामीण– न बसवराज पाटील. १७. नांदेड उत्तर– ॲड. किशोर देशमुख. १८. नांदेड दक्षिण– संतुकराव हंबर्डे. १९. बीड– शंकर देशमुख. मुंबई :– २०. उत्तर पश्चिम मुंबई– ज्ञानमूर्ती शर्मा. २१. दक्षिण मध्य मुंबई– निरज उभारे. २२. दक्षिण मुंबई– श्रीमती शलाका साळवी.



पारनेर तालुक्यातील भाळवणी येथे झालेल्या पावसाने विहिरी तुडुंब भरल्या होत्या. (छाया – विजय मते)

# १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची घटना नगर तालुक्यातील साकत खुर्द परिसरात २९ मे रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.

रात्री उशिरापर्यंत मुलगी घरी न आल्याने तिच्या घरच्यांनी तिचा साकत परिसरात, तिच्या मैत्रिणीकडे, नातेवाईकांकडे विचारणा करुन शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. यावरुन तिचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याच्या संशयावरून तिच्या वडिलांनी ३० मे रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार गांगर्डे हे करीत आहेत.

# नगरप्रेमी नागरिकांचा ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याचे राष्ट्रीय स्मारक करण्याचा संकल्प

## शहर स्थापना दिनी रसिक ग्रुपचा अनोखा उपक्रम



रसिक ग्रुपच्यावतीने भुईकोट किल्ल्या जवळ 'पर्यटन नगरी अहिल्यानगर' असा फलक लाऊन व किल्ल्याचे पूजन करून शहर स्थापना दिन साजरा केला. यावेळी जयंत येलूलकर, प्रा.नवनाथ व्हावळ, राजेंद्र कांबळे, शैलेश राजगुरू, प्रा.सीताराम काकडे आदींसह नगरप्रेमी व रसिक ग्रुपचे सदस्य.

नगर – भरपूर पाऊस पडून गेल्याने हिरवळच्या निसर्गरम्य व प्रसन्न वातावरणात शहरातील भुईकोट किल्ल्याच्या झुलत्या पुला जवळ एक पणती प्रज्वलित होते. काही ध्येयवेडे नगरप्रेमी काट्याकुट्यातून, चिखलातून मार्ग काढत किल्ल्याचे पूजन करतात व 'उधळीत शतकीरणा उजळीत जनहृदया...' या स्फूर्ती गीताच्या पंक्ती म्हणत भविष्यात हा किल्ला राष्ट्रीय स्मारक करण्याचा संकल्प करतात. नगरचा ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या रसिक ग्रुपच्या वतीने शहराच्या स्थापना दिनानिमित्त ऐतिहासिक भुईकोट किल्यातील झुलत्या पूलाजवळ 'पर्यटन नागरी अहिल्यानगर' असा फलक लाऊन व किल्ल्याचे पूजन करून अनोख्या पद्धतीने शहराचा स्थापना दिन साजरा केला. रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर यांच्या संकल्पनेतून झालेल्या या कार्यक्रमास नगरप्रेमी नागरिक उपस्थित होते.

यावेळी जयंत येलुलकर म्हणाले, पंचशताब्दी वर्षांचा गौरवशाली व ऐतिहासिक वारसा लाभलेले आपले शहर आता अहिल्यादेवींच्या नावाने ओळखले जाऊ लागले आहे. त्यामुळे या शहराला आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्याई लाभणार आहे. स्थापना दिनानिमित्त ज्यांनी हे शहर वसवले, ज्यांनी शहर सांभाळले व ज्यांनी शहराचा विकास केला, त्यांच्याप्रती रसिक ग्रुप कृतज्ञता व्यक्त करत आहे. आज शहर वाढत आहे, विकसित होत आहे पण दुर्देवाने शहराचा पर्यटन विकास खुंटला आहे. शहरात असलेल्या ऐतिहासिक स्थळांमुळे हे शहर देशातील पहिल्या १० शहरांमध्ये येऊ शकते पण सर्वांच्या उदानसीतेमुळे हे होऊ शकले नाही. देशात प्रसिद्ध असलेला भुईकोट किल्ल्याकडेही दुर्लक्ष होत आहे. बुरुजांवर वाढणाऱ्या झाडांमुळे काही दिवसांनी बुरुज ढासळून हा खंदक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा किल्ला जपण्यासाठी व विकासासाठी याचे राष्ट्रीय स्मारक होणे गरजेचे आहे. पण आजपर्यंत एकाही लोकप्रतिनिधीने यासाठी प्रयत्न केले नाहीत, ही शोकांतिका. नगरमध्ये एकही पर्यटन स्थळ नसल्याने बाहेर गावातून येणारे पर्यटक शहरात थांबत नाहीत. त्यामुळे शहर पर्यटन विकासापासून वंचित आहे. त्यामुळे या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याचे राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी रसिक ग्रुप पुढाकार घेऊन पाठपुरावा करणार आहे.

प्रा.सीताराम काकडे म्हणाले, रसिक ग्रुप व जयंत येलूलकर अत्यंत तळमळीने नगरसाठी काहीतरी करण्याची धडपड करत असतात. शहराचा स्थापना दिन साजरा करण्याची सुरवात रसिक ग्रुपने करून चांगला पायंडा पाडला आहे. नगर दर्शन सारखे उपक्रम राबवून नगरकरांना शहराची ऐतिहासिक ओळख करून दिली आहे, अशा शब्दात उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी इतिहास संशोधक डॉ.प्रा.नवनाथ वाव्हळ यांनी शहराचा वैभवशाली इतिहास थोडक्यात सांगितला. शैलेश राजगुरू यांनी शहरातील ऐतिहासिक स्थळांचे सोशल मिडीयाद्वारे प्रसिद्धी करा, असे सांगितले. स्नेहल उपाध्ये यांनी 'उधळीत शतकीरणा' हे गीत सदर केले. यावेळी उद्योजक विकास सांगळे, महावीर गोसावी, रेणावीकर शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, जालिंदर बोरुडे, ज्येष्ठ कवी ल. धो. खराडे, दिनानाथ देशमाने, शैलेश राजगुरू, प्राजक्ता डफळ आदी उपस्थित होते.

रसिक ग्रुपच्या दिपाली देऊतकर यांनी स्वागत केले. निखील डफळ यांनी प्रास्ताविक केले. प्रसन्न एखे यांनी आभार मानले.

### किल्ल्याच्या संवर्धनासाठी खा.निलेश लंके यांनी दिला सकारात्मक प्रतिसाद

यावेळी प्रा.सीताराम काकडे यांनी कार्यक्रम सुरु असतानाच खासदार निलेश लंके यांना मोबाईलवर संपर्क करून त्यांच्या गड किल्ले संवर्धन मोहिमेत भुईकोट किल्ल्याचा समावेश करण्याची विनंती केली. तसेच जयंत येलुलकर यांनीही हा किल्ला केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्याने किल्ल्याचे राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी दिल्ली दरबारी पाठपुरावा करण्याची मागणी खा.लंके यांच्याकडे केली. यावेळी खा.लंके यांनी ताबडतोब या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देत आपण सर्व मिळून यासाठी प्रयत्न करू, असे सांगून लवकरच किल्ल्यास भेट देऊ असे सांगितले.

# जामखेड रोडवरील अपघातात अहिल्यानगरच्या तरुणाचा मृत्यू



आदेश घोरपडे

नगर – नगर – जामखेड रोडवर नगर तालुक्यातील टाकळी काझी गावच्या शिवारात पिकअप वाहनाची मोटारसायकलला जोराची धडक बसून एक युवकाचा मृत्यू झाला असून अन्य एक युवक जखमी झाला आहे. हा अपघात ३० मे रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडला.

या अपघातात आदेश नंदू घोरपडे (वय १९, रा. आदर्शनगर, कायनेटिक चौकाजवळ, रेल्वे स्टेशन) हा मयत झाला तर त्याच्या बरोबर असलेला त्याचा मित्र मोहित निमसे हा जखमी झाला आहे. मयत आदेश व त्याचा मित्र मोहित हे दोघे मोटारसायकलवर टाकळी काझी गावाकडून नगरच्या दिशेने येत होते, तर पिकअप वाहन नगरहून जामखेडच्या दिशेने जात होते. या दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. अपघातानंतर त्याठिकाणी नागरिक जमा झाले, त्यांनी रुग्णवाहिका बोलावून दोघांना उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविले.

रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना तपासून यातील आदेश घोरपडे याला उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. मयत आदेश याच्या पश्चात आई व भाऊ असा परिवार असल्याचे त्याच्या निकटवर्तीयांनी सांगितले.

# १ जून रोजी महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा; २३ परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ चे आयोजन १ जून रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत अहिल्यानगर जिल्हा केंद्रावरील २३ उपकेंद्रांवर करण्यात आले आहे. परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्र.केंद्रप्रमुख महाराष्ट्र लोकसेवा आयोग तथा निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांनी उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

परीक्षेसाठी ८ हजार ३०१ उमेदवार बसलेले असून ६ उपजिल्हाधिकारी दर्जाचे समन्वय अधिकारी, १ उपजिल्हाधिकारी दर्जाचे भरारी पथकातील अधिकारी, २३ उपकेंद्रप्रमुख म्हणून वर्ग १ चे अधिकारी, ४६ सहायक, ८२ पर्यवेक्षक, ४०१ समवेक्षक, ७ समन्वय अधिकारी व भरारी पथक यांचे सहायक, ३ लिपीक, २३ केअर टेकर, २३ बेलमन, ५९ शिपाई, ८२ पाणी वाटप कर्मचारी आणि ३० वाहनचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना सकाळी ८.३० वाजता प्रवेश देण्यात येणार आहे. उमेदवारांनी आयोगाने दिलेल्या सुचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. परीक्षा कक्षात मोबाईल, कॅल्क्युलेटर, डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन आदी दूरसंचार साधने आणण्यास आणि परिक्षा केंद्र परिसरात बाळगण्यास मनाई करण्यात आले आहेत. उमेदवारांनी परीक्षेसाठीची प्रवेशपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करायची आहेत. दुय्यम प्रवेश प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयातून देण्यात येणार नाहीत.

परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामधील सर्व एसटीडी बुथ, फॅक्स, झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्यात यावेत, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# महिलेच्या विनयभंग व मारहाण प्रकरणी आरोपीला १ वर्षाची शिक्षा

नगर – केडगाव येथील महिलेच्या घरात घुसून विनयभंग करत मारहाण केल्याच्या गुन्ह्यात आरोपी संजीव सिद्दाम बिराजदार (रा.माधवनगर, लिंकरोड, केडगाव) यास येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती यु. टी. मुसळे यांनी १ वर्ष सश्रम कारावास व ६ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

केडगाव येथील ३८ वर्षीय महिलेला मारहाण करत विनयभंग केल्याची तसेच धमकी दिल्याची घटना २६ मे २०२३ रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली होती. याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात आरोपी संजीव बिराजदार याच्याविरुद्ध भादंवि कलम ३५४, ४५२, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडधिकारी श्रीमती यु. टी. मुसळे यांच्यासमोर झाली. त्यांनी आरोपीला दोषी धरत कलम ३५४ प्रमाणे १ वर्ष सश्रम कारावास व २ हजार रुपये दंड, कलम ४५२ प्रमाणे १ वर्ष सश्रम कारावास व २ हजार रुपये दंड तसेच कलम ३२३ प्रमाणे ६ महिने सश्रम कारावास व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. धैर्यशील उर्फ अजित वाडेकर यांनी काम पाहिले.

# दुकानाचे शटरचे कुलूप तोडून २ मोबाईलची चोरी

नगर – बंद दुकानाचे शटरचे कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत आतील काउंटरवर ठेवलेले २६ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल चोरुन नेले. ही घटना सर्जेपुरा येथील हरिजनवस्ती येथे २७ मे रात्री १० ते २८ मे सकाळी ५.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत अनिल रोहिदास साठे (वय ५५, रा. सर्जेपुरा, हरिजन वस्ती, अ.नगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे महापालिकेत सफाई कामगार म्हणून काम करीत असून त्यांचे अनुष्का नावाचे किराणा दुकान आहे. २७ मे रोजी रात्री दहा वाजता त्यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद केले. त्यावेळी फिर्यादी व त्यांची पत्नी यांचे मोबाईल चार्जिंग करता दुकानाच्या काउंटरवर लावले होते. २८ मे रोजी सकाळी ड्युटीवर जायचे असल्याने फिर्यादी हे सकाळी दुकानात मोबाईल घेण्यासाठी गेले असता त्यांना दुकानाचे शटर अर्धवट उघडे दिसले. तसेच दुकानाच्या शटरला लावलेले कुलूप बाजूला पडलेले दिसले. त्यांनी दुकानात जाऊन पाहणी केली असता दुकानाच्या काउंटरवर ठेवलेले दोन्ही मोबाईल त्यांना दिसून आले नाही. ते दोन मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अनिल साठे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### आंबे खा पण जपून

मधुमेह असलेल्या लोकांसाठी आंबा खाणं खरंच घातक आहे का? अनेकांना वाटतं की आंबा म्हणजे साखरेचा साठा, पण खरोखरच तो रक्तातील साखर वाढवतो का? आंब्याचं पौष्टिक मूल्य, त्यातील नैसर्गिक साखर आणि योग्य प्रमाणात सेवन केल्यास काय परिणाम होतो, हे जाणून घ्या. आंब्यामुळे मधुमेह होत नाही, परंतु तो मध्यम ते उच्च ग्लायसेमिक इंडेक्सवाला असल्याने, तो रक्तातील साखरेची पातळी वाढवू शकतो. मधुमेह असलेल्या व्यक्तीने आंबा खाताना प्रमाण आणि वेळ योग्य ठेवायला हवा. आंबा मर्यादित प्रमाणात खावा. दररोज १०० ग्रॅम पर्यंत आंबा खाऊ शकता. आंबा जेवणासोबत किंवा लगेच खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. त्यामुळे तो इतर अन्नासोबत किंवा लगेच न खाणे चांगले. त्याचप्रमाणे आंबा खाण्यापूर्वी किमान अर्धा तास पाण्यात भिजवून मग खाल्ल्यास त्यातील उष्णता कमी होते आणि पचनास मदत होते.

## पाककला

### पौक कटलेट

**साहित्य :** ३ उकडलेले बटाटे, १ कोवळी ज्वारीचे हीरवे दाणे, १/२ कप भिजलेले पोहे, १ टीस्पून प्रमाणे हळदी पावडर, लाल मिरची पावडर, धना पावडर, चवीनुसार मीठ, १ टीस्पून लाल मिरचीची चटणी, कांद्याची पात हिरव्या लसूण पातीचा ठेचा, २-३ टेबलस्पून ब्रेडक्रम्स, गरजेनुसार तेल

**कृती :** सर्वात आधी हुरडा पॅन मधून भाजून घेऊ. नंतर मिक्सरमधून हुरडा चरबडीत दळून घेऊ. कांद्याची पात, हिरवा लसूण आणि हिरवी मिरचीचा ठेचा तयार करून घ्या. एका बाऊलमध्ये उकडलेले बटाटे स्मॅश करून देऊ. पोहे मिक्स करून घेऊ दळलेला हुरडा टाकून घेऊ. आता त्यात हिरवा ठेचा, लाल मिरची चटणी ब्रेडक्रम्स, मीठ मसाले सगळे टाकून घेऊ. व्यवस्थित मिक्स करून गोळा तयार करून घेऊ. हाताला थोडे तेल लावून चपटे कटलेट तयार करून घ्यावे. आता पॅन गरम करून त्यात थोडे तेल टाकून पॅनमध्ये कटलेट शालो फ्राय करून घ्यावे. पौक कटलेट तयार आहे.

## सल्ला

### याने पोळ्या टम्म फुगतील

* कणीक मळल्यानंतर थोडा वेळ थांबा. कणीक मळून घेतल्यानंतर त्यावर हलक्या हाताने पाण्याचा थर तयार करून १५ मिनिटे असेच राहू द्या. असे केल्याने तुमच्या पोळ्या मऊ आणि नरम होतील. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही मैद्यामध्ये थोडे तेलही मिक्स करू शकता.

* तवा गरम केल्यानंतर, पोळी भाजताना गॅस मंद ठेवणे चांगले. तवा खूप गरम असेल तर पोळ्या आधीच जास्त शिजल्या जातात आणि चुलीवर भाजून घेतल्यास त्या कडक होतात. पोळ्यांवर तूप लावून गरम पोळीची मजा घ्या.

## वास्तू

* पूर्वेकडील किंवा उत्तर दिशेने असलेली बाग चांगली मानली जाते. जर घरासमोर बाग असेल तर कोणत्याही मोठ्या झाडाने प्रवेशद्वार अडवले नाही गेले पाहिजे. हे सकारात्मक उर्जा आणते.

* कारंजे उत्तर, ईशान्य किंवा वायव्य दिशेने ठेवावे.

## सौंदर्य

केस लांबसडक होण्यासाठी २ कप गरम पाण्यामध्ये ७-८ मिनिट्स १ ग्रीन टी बॅग ठेऊन द्या. हे पाणी तुमच्या केसांना मुळांपासून लावा. एका तासासाठी केस तसेच ठेवा. नंतर गार पाण्याने केस धुवा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १ जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, आश्लेषा २१।३७, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**वृषभ :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल. राजकीय व्यक्तींसाठी चांगला दिवस.

**मिथुन :** एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. वाहने व उपकरणे बिघडतील.

**कर्क :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**सिंह :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे आपल्या मनात गैरसमज निर्माण करतील.

**कन्या :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**तूळ :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**वृश्चिक :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल.

**धनु :** मनोबल व तब्येत बिघडू शकते. प्रगतीकडे वाटचाल कराल. कामामध्ये मन रमणार नाही.


**मकर :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कुंभ :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**मीन :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल. मानसिक सुख मिळेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

## शब्दगंध क्र. ७१८९ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१८८ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) मोठा सोहळा ३) अत्युच्च; सर्वोच्च ५) बांगला देशचे चलन ६) जेल; तुरुंग; बंदिशाला ७) जेथे कामगारांद्वारे वस्तू उत्पादित केल्या जातात ती जागा १०) भारतातील एक नदी १२) समज असलेला; शहाणा; ज्ञानी १४) विधी; नियम; लॉ १६) विड्याचे पान रंगण्याचा पदार्थ १७) वाद्यांचा मोठा आवाज १८) तारुण्याचा भर; अपूर्वता २२) एक आंबटगोड फळ २३) जवळ; नजीक; सांनिध्यात

**उभे शब्द :-** १) एक प्रकारचा जुगार २) होय म्हणणे; संमती ३) देश सोडून पळून गेलेला ४) एक कडधान्य ८) लोकसभेचा किंवा राज्यसभेचा सभासद ९) वस्तुमात्राचे संबोधन; नाव; गंधाचा टिळा ११) वाघाचे ओरडणे १३) पूर्वेकडील एक प्रगत देश १४) एक पक्षी; काक; कावळा १५) यज्ञकर्ता; स्वामी; मालक; पती १९) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार २०) गावाचे प्रवेशद्वार २१) अधर्म; पातक

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जर आपल्याला मधासारखा गोड परिणाम पाहिजे असेल तर मधमाशी सारखे एकत्र रहाणे आवश्यक आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पक्षी पिसे का विंचरतात?

पक्षांना पिसे असतात जी त्यांना उडण्यास मदत करतात, तसेच शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. पिसे हे पक्षी शरीराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, जी विविध आकार, रंग आणि प्रकारात असू शकतात.

मोराची पिसे मोठ्या आकाराची आणि आकर्षक रंगाची असतात. चिमणीची पिसे लहान आणि विविध रंगाची असू शकतात. पोपटाची पिसे मजबूत आणि गोलसर असतात, जी त्याला उडण्यास मदत करतात.

शरीरावर अनेक ठिकाणी विविध प्रकारची पिसे असतात, जसे की पंखांची पिसे, तसेच शरीराची पिसे. पक्ष्यांसाठी पिसे अत्यंत आवश्यक असतात, कारण ते त्यांना उडण्यास मदत करतात आणि शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.


बहुतेक सर्वच पक्षी एका जागी बसले की, चोचीने आपली पिसे विंचरताना आढळून येतात. पक्ष्यांना पंख फुटले की ते हा उद्योग सुरू करतात. पिसे साफ करणे हा या मागचा हेतू असतोच, पण त्यापेक्षाही या पिसांवर तेल पसरवणे हा या मागचा प्रमुख हेतू असतो. पक्ष्यांच्या शेपटीवर, ती जिथे शरीराला मिळते तिथे तैल ग्रंथी असतात.

हे तेल पिसांवर पसरले की, पिसे स्वच्छ तर होतातच, पण या तेलामुळे पक्ष्यांच्या शरीरावर पाणी पडताच ते निथळून जाते. शिवाय या तेलावाटे पक्ष्यांना डी जीवनसत्व मिळत राहते ते वेगळेच.

### मुचकुंदाची कथा

सूर्यवंशातील ईक्ष्वाकू राजाचा नातू मुचकुंद हा होय. तो अयोध्येस राज्य करीत असता, ब्रह्मदेवाच्या वरामुळे तारकासुर नावाचा राक्षस फार उत्पात घडवू लागला. बरीच वर्षे देवांनी त्याच्याशी युद्ध करुनही तो अजिंक्यच राहिला. मुचकुंद राजा हा रणविद्येत अत्यंत पारंगत असल्यामुळे त्याची मदत घ्यावी, या नारदांच्या सल्ल्यानुसार इंद्राने मुचकुंदाला अमरावतीस बोलावून घेतले. बराच काळ युद्ध होऊन शेवटी तारकासुराचा वध झाला. मुचकुंदाच्या उपकारातून मुक्त होण्यासाठी इंद्राने त्याला वर मागण्यास सांगितले. तेव्हा त्याने मोक्षप्राप्तीचे वरदान मागितले. पण इंद्राने सांगितले, मोक्षदान देण्याची पात्रता आमच्याकडे नाही. द्वापारयुगात तुला श्रीकृष्ण भेटेल व तो तुला मोक्ष देईल. तोपर्यंत तू अयोध्येस सुखाने राज्य कर.

(क्रमश:)



## जीवन का अमृत (भाग १)

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

१६. संतमत एक अंधविश्वास का रास्ता नहीं है, यह तो स्वयं के अनुभव का रास्ता है। जो आत्माएँ तैयार हैं, वे इस पवित्र रास्ते पर खींच ली जायेंगी। जो पहले से ही इस रास्ते पर चल रहे हैं उनके लिए सत्संग महत्त्वपूर्ण हैं और यह सतुरु की प्यार भरी दया को पाने में और उसका आनंद उठाने में सहायता करता है।

प्रभु तक जाने के लिए मुख्य बात है, प्रभु की लगातार याद। सब तीर्थ यात्राओं, पूजा स्थलों और भक्ति भाव से किए गए कर्म-कांडों का यही एक उद्देश्य है। यह इंसानी शरीर सच्चा हरि मंदिर है। जब शिष्य सदाचारी जीवन जीता है, तो यह एक उपजाऊ भूमि है, जिसमें रूहानियत का बीज तेजी से उगता है। सभी बच्चे सतुरु को समान रूप से प्यारे हैं और वह चाहता है कि वे सुन्दर, प्यारे फूल बन जाएँ, जिनसे प्रभु के प्रेम की तेज खुशबू चारों ओर फैले । सतुरु का अपने बच्चों के लिए प्रेम हर वस्तु से ज्यादा होता है, चाहे वे जवाहरात हों, आभूषण हों या हीरे पन्ने हों।

(क्रमश:)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

## अंतरिक बल (भाग - २)

### विशुद्ध ऊर्जा चक्र

किसी व्यक्ति, जीव व पक्षियों को देखते ही उनके माथे व सिर में देखें और सोचे आप शांत हैं, आप स्नेही हैं तो आप उनसे यही उर्जा लेने लगेगें। पौधों के तने के ऊपर जहां से टहनियां फूटती हैं उस स्थान पर प्रकाश का बिंदु देखें, यहीं पर पेड़ की पॉजिटिव विद्युत का केन्द्र हम मान सकते हैं कि होता है। इस चक्र के जागृत होने पर राजयोगी या साधक का अपने सूक्ष्म शरीर से सम्पर्क हो जाता है। सूक्ष्म शरीर के माध्यम से वह एक कण के रूप में प्रवर्तित हो कर किसी भी स्थान पर जा कर वापिस आ सकता है, इच्छा अनुसार आपना रूप धारण कर सकता है। अगर आप यह सिद्धि चाहते हैं तो अपने आप को सूक्ष्म बिंदु समझा करें। सुबह ध्यान में खासतौर पर और काम धन्धा करते हुए भी समझे मैं बहुत छोटा एक ग्राम के सामान हूं। यह अभ्यास दिन में एक बार ५ मिनट जरुर करना है। धीरे धीरे आप को यह सिद्धि मिल जाएगी। कोई आप से बोल रहा है, बात कर रहा है, तब भी समझे मेरा शरीर छोटा सा एक ग्राम के सामान है और सुन रहा हूं। जीवन में कुछ समस्याएं और विघ्न, बातें या व्यहवार हमें सहने पड़ते हैं, और उन से दुःखी होते रहते हैं। जब यह चक्र जागृत होता है, ऐसे विघ्न हमें जरा भी प्रभावित नहीं कर सकते । चिन्ता के विचार

(क्रमश:)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

## साहित्य सहवास - 'आई, बाप-लेकी....'

अंकिता आणि निकिता - ह्या आमच्या लेकी. दोघीही हुशार, प्रेमळ, मनमिळाऊ. माझ्या पत्नीने - सौ संगिताने- नोकरी न करण्याचा निर्णय घेतला. अंकिता आणि निकिताला शाळा, क्लासेसला सोडणं, घेऊन येणं, त्यांचा अभ्यास घेणं, अवांतर वाचन करणं, त्यांच्यावर सुसंस्कार करत दोघींना, आम्ही दोघं कायम सांगत राहिलो भविष्याचा विचार करता दोघींनी स्वतःच्या पायांवर ऊभ्या राहा. दोघीही १० वी, १२ वी, बॉ. कॉम., एम.कॉम. चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्या. आज दोघीही स्वतः च्या पायांवर ऊभ्या आहेत ह्याचा राऊत कुटुंबाला अर्थातच आम्ही दोघं, माझा भाऊ, भावजय, आई ह्यांना अभिमान आहे. दोघींमधला अत्यंत चांगला, मला आवडलेला, अनुकरणीय गुण म्हणजे दोघींनीही शिक्षणावर मनापासून केलेलं प्रेम आणि शाळा, महाविद्यालयातली शंभर टक्के उपस्थिती. मी दोघींना सांगायचो आज मी जो काही आहे ते शिक्षणामुळे, अवांतर वाचनामुळे. दोघींनीही हे आत्मसात केलं. अंकिता मे २०१६ मध्ये 'टीसीएस' मध्ये पुण्याला हजर झाली. लेकीला पुण्याला सोडुन येतांना खुप रडलो मी. जानेवारी २०१९ मध्ये अंकिताचं लग्न झालं. एका चांगल्या कुटुंबाशी जमदाडे कुटुंबाशी - कायमचं नातं जोडलं गेलं. जावई, व्याही, माझी मैत्रीण बहिण - विहीणबाई, मुलीची नणंद, आज्जी, आजोबा सगळ्यांनीच अंकिताला खूप प्रेम दिलं. आज चांगल्याप्रकारे तिचा संसार चालु आहे, ह्याचा बाप म्हणून आनंद आहे. जमदाडे कुटुंबिय वेळोवेळी, अगदी अर्ध्यारात्री हाक मारली की पाठिशी, सोबत असतं. आता शिंदे कुटुंबियांशी कायमचं नातं जोडलं जाणार आहे.

लवकरच निकिता-ओंकारचं लग्न होणार आहे. ह्यासाठी विलासराव साबळे हे माध्यम झाले, त्याबद्दल त्यांचे आभार न मानता ऋण व्यक्त करतो. निकिताचं जमल्यापासून मी अत्यंत भावनाशील झालो आहे. रडतो आहे. इतिहास साक्ष आहे मुलींवर बापाचं सर्वाधिक प्रेम असतं. निकिताच्या आयुष्यात, कमी वयात खुप संघर्षाचे प्रसंग आले पण हिंमतीने तिने संकटांचा सामना केला. आज जिद्दीने स्वतः च्या पायांवर ऊभी राहिली. शिंदे कुटुंबियही चांगले आहेत. आज, आम्ही दोघं पती - पत्नी अर्थात राऊत कुटुंबिय भाग्यवान समजतो की आम्हाला दोन्हीही जावई, जमदाडे आणि शिंदे कुटुंबिय ही चांगली माणसं मिळालीत. जेव्हा आपले जवळचे नातेवाईक चांगल्या आचार, विचारांचे असतात तेव्हा आपल्या सर्वांची प्रगतीच होते.

अंकिताचं टीसीएस मध्ये हजर होणं, लग्न, अंशचा जन्म, निकिताचं एम कॉम होणं, चांगल्या कंपनीत नोकरी लागणं, जमदाडे आणि शिंदे कुटुंबियांशी कायमचं जोडलेलं नातं ही श्री साई, स्वामींची कृपा आहे, आशिर्वाद आहे. आजपर्यंत निकिताचं आमच्या घरात असणं आमच्यासाठी ममत्वाचं होतं आणि ह्यापुढेही असणारंच आहे. दुसरीही लेक आता आमच्यापासून दुरावणार ह्यामुळे अश्रु थांबणं शक्य नाही. अंकिताच्या लग्नाच्या वेळी घरासमोर मांडव उभारला गेला. तो मांडव पाहुन मी रडलो. आताही पुन्हा मांडव उभारला जाणार. मी फार हळवा आहे. बऱ्याचदा मनमोकळं रडता येत नाही तेव्हा मनातल्या मनात रडतो. शिंदे कुटुंबियही निकिताला मुलीसारखंच सांभाळणार जसं जमदाडे कुटुंबिय अंकिताला लेकीसारखं जपतं, सांभाळतं अगदी तसंच, ह्याबद्दल दुमत नाहीच. मुलीचं लग्न हा प्रत्येक बापाच्या आयुष्यातला अत्यंत आनंददायी आणि पोटचं लेकरु दुरावणार म्हणून वेदनादायी असतं. पण हा निसर्ग नियम आहे. आज ना उद्या हे होणारंच असतं. मनापासून वाटलं लेकींविषयी ह्या आधी लिहिलं नाही. लिहावं. मनसोक्त रडावं. एक प्रकर्षाने जाणवलं ह्यासाठी मुलीचा बाप व्हावच लागतं. आज निकिताची जन्मापासूनची सगळी रूपं आसवं भरल्या डोळ्यांसमोर येतात. तिचा जन्म, रांगणं, पहिलं पाऊल उचलुन चालणं, शाळा, वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये घेतलेला सहभाग, मिळालेली बक्षिसं, कॉलेज, पदवीधर होणं, नोकरी... तिचं पुण्याला जाणं. हे सगळं अगदी आत्ता घडल्यासारखं वाटतं. रक्ताची काही नाती प्रचंड हळवी, ममत्वाची असतात. अंकिता, तिच्या संसारात आनंदी आहे. सासरची मंडळी प्रेमळ, समजदार आहेत, हे आमच्यासाठी आनंददायी आहे, छान आहे. निकिताचा संसार सुरु होईल. शिंदे कुटुंबिय नक्कीच मुलीसारखं प्रेम तिला देतील ही शंभर टक्के खात्री आहे. दोन्हीही जावई, सासरची मंडळी चांगली भेटलीत हे आमचं भाग्य समजतो. अंकिता, निकिताचे मामा नंदकुमार नगरे, मामी अरुणा, आज्जी रंजना, मंजुळाबाई, आजोबा भाऊसाहेब नगरे, मावशी कल्पना, काका दत्तात्रय, चुलता अजय, चुलती शितलसह अनेकांनी चांगले विचार, अनुभव सांगितले आहेत, सुसंस्कार केले आहेत. निकिता, आता वडिलांच्या जागी सासरे, मम्मीच्या जागी सासुबाई आहेत असं समजुन हसत खेळत संसाराचा गाडा तुम्ही दोघांनी एकमेकांना साथ देत ओढायचा आहे. राऊत, जमदाडे, शिंदे, क्षिरसागर, नगरेंसह सगळेच तुमच्या सोबत असणार आहेत. एकमेकांची काळजी घ्या. जीवन खुप सुंदर आहे.

(लेख क्र.५५२)

- **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

**सुमाताई -** काय हो, तुमची बनी पास झालीय ना ?
मग ती नदीच्या काठावर उभी राहुन काय करतेय एवढा वेळ? काही बरं वाईट...
**बनीची आई -** छे हो, आमची बनी किनई काठावर पास झाली,
म्हणून ती काठावर उभी आहे.''

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्र राज्याच्या पोलिस महासंचालक?

- रश्मी शुक्ला

- **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

हिपॅटायटीस 'ए'मध्ये आयुर्वेदिक उपचार लाभदायक ठरतात. आरोग्यवर्धिनी २५ मि.ग्रॅ., सूतशेखर २५ मि.ग्रॅ., शंखभस्म २५ मि.ग्रॅ. हे मिश्रण दिवसातून दोन वेळा द्यावे. कुमारी आसव दोन-दोन चमचे द्यावे. शरीर गरम होत असेल किंवा हातापायांची, डोळ्यांची आग होत असेल, तर काम दुधावटी, चंद्रकला रस, प्रवाळपंचामृत इत्यादी कल्प वापरावेत. अंगास खाज येत असेल, तर वंगभस्म तज्ज्ञ वैद्याच्या सल्ल्याने वापरावे. यकृतावर कार्य करणारे लिव्ह-५२ सायरप ५ मि.लि. तीन वेळा द्यावे.

स्वच्छ वातावरण, शुद्ध पिण्याचे पाणी आणि ताजे, सकस, साधे अन्न यांच्या मदतीने कावीळ या आजारापासून आपले संरक्षण करता येते. यकृताचा आजार असल्याने आहारामध्ये कर्बोदके जास्त असावीत व प्रथिनांचे प्रमाण कमी करणे महत्त्वाचे आहे.

कावीळ झाल्यानंतर तळलेले, मसाल्याचे पदार्थ खाऊ नये. वरण-भात, भाजी-पोळी, फळे असा आहार बालकाला द्यावा.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# बांधकाम साहित्याची गुणवत्ता चाचणी : काय आहे, का गरजेची आहे, कशी करावी आणि त्याचे महत्त्व

**१. काय (What) ? :** बांधकाम साहित्याची गुणवत्ता चाचणी म्हणजे बांधकामामध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट, स्टील, काँक्रीट, माती व इतर साहित्याचा दर्जा, ताकद आणि सुरक्षितता यांची वैज्ञानिक व प्रयोगशाळेत तपासणी करणे. यामध्ये काँक्रीटची ताकद, स्टीलचा टिकाऊपणा, मातीची क्षमता व इतर घटकांची गुणवत्ता यांचा समावेश असतो.

**२. का (Why) ?**

**सुरक्षितता :** चांगल्या दर्जाच्या साहित्याशिवाय बांधकाम कमजोर होते, ज्यामुळे इमारत कोसळण्याचा धोका वाढतो.

**टिकाऊपणा :** योग्य चाचणी न केल्यास बांधकाम लवकर खराब होऊ शकते, ज्यामुळे दुरुस्तीचा खर्च वाढतो.

**कायदेशीर गरज :** अनेक नियम व कोड (आय एस एन बी सी) बांधकामासाठी योग्य चाचणी अनिवार्य करतात.

**मानवहानी टाळणे :** चुकीच्या साहित्यामुळे अनेक लोकांचे जीव जात आहेत, त्यामुळे गुणवत्ता तपासणी अत्यंत गरजेची आहे.

**३. कशी (How) ?**

**प्रयोगशाळा चाचणी :** सिमेंटची मजबुती (IS 4031), स्टीलची ताण क्षमता (टेन्साइल टेस्ट), काँक्रीटची ताकद (क्यूब टेस्ट, स्लंप टेस्ट) या चाचण्या करणे.

**भू-तकनीकी चाचणी :** मातीची क्षमता (सॉईल बिअरिंग टेस्ट), पाण्याची पातळी आणि भू-स्थिरता तपासणे.

**स्ट्रक्चरल ऑडिट :** इमारतींच्या रचनेची वेळोवेळी तपासणी करून नुकसानाची स्थिती जाणून घेणे.

**साइटवर नियमित निरीक्षण :** बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर चाचण्या व तपासणी करणे.

**४. महत्त्व (Importance)**

**जीवन व मालमत्तेचे संरक्षण :** दर्जा न तपासल्यास भिंत, छत, स्तंभ कोसळण्याचा धोका असतो, ज्यामुळे मानवी जीव आणि आर्थिक नुकसान होते.

**प्रकल्पाचा दीर्घायुष्य :** योग्य साहित्य आणि चाचणीमुळे इमारतींचा टिकाऊपणा वाढतो.

**कायदेशीर बचाव :** चाचणीचा पुरावा असल्यास बांधकाम कंपनी किंवा मालकांसाठी कायदेशीर संरक्षण मिळते.

**उत्पादनाचा दर्जा वाढवणे :** बांधकाम क्षेत्रात विश्वास निर्माण करणे.

बांधकामातील समस्या टाळण्यासाठी वेळेवर व योग्य चाचणी कशी करावी?

**१. योग्य चाचणी म्हणजे काय ?**

बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याची गुणवत्ता, टिकाऊपणा आणि सुरक्षितता तपासण्याची प्रक्रिया म्हणजे योग्य चाचणी. यात प्रयोगशाळेत साहित्याची ताकद, स्थिरता, आणि पर्यावरणीय अनुकूलता तपासली जाते.

**२. समस्या टाळण्यासाठी वेळेवर चाचणी का आवश्यक?**

**दोष लवकर शोधणे :** सुरुवातीलाच दोष सापडल्यास तो दुरुस्त करता येतो, मोठा अपघात होण्यापूर्वीच टाळता येतो.

**खर्च बचत :** नंतरच्या दुरुस्तीपेक्षा वेळेवर दोष शोधून दुरुस्ती करणे स्वस्त पडते.

**कायदेशीर जबाबदारी टाळणे :** नियमांनुसार वेळेवर चाचणी केल्यामुळे कायदेशीर गुंतागुंत कमी होते.

**सुरक्षा वाढवणे :** गुणवत्तेची खात्री झाल्यामुळे बांधकाम अधिक सुरक्षित होते.

**३. वेळेवर चाचणी कशी करावी?**

**चाचणी योजना तयार करा :** प्रकल्पाच्या सुरुवातीला कोणती कोणती चाचणी करायची आहे, याचा तपशीलवार आराखडा तयार करा.

**तृतीय पक्ष (थर्ड पार्टी) प्रयोगशाळांचा वापर :** स्वच्छ आणि निष्पक्ष चाचण्या करण्यासाठी स्वतंत्र व मान्यताप्राप्त प्रयोगशाळांचा वापर करा.

**चाचणी वेळापत्रक पाळा :** प्रत्येक टप्प्यावर, उदा. सिमेंट, स्टील, काँक्रीट यांची नियमित चाचणी घ्या.

**अहवालांचे बारकाईने विश्लेषण :** चाचणी अहवाल नीट

Quality Testing Services
STRONG TECH
ENGINEERING SERVICE & RESEARCH (I) PVT. LTD.
The Construction Material Testing Laboratory
NABL Accredited Laboratory









वाचा आणि त्यात दोष असल्यास तत्काळ दुरुस्ती करा.

**प्रकल्प व्यवस्थापनाशी संवाद :** बांधकाम कंपनी, अभियंते आणि गुणवत्ता नियंत्रण टीम यांच्यात सतत संपर्क ठेवा.

**४. चाचणीने टाळता येणाऱ्या प्रमुख समस्या :**

* इमारत कोसळणे किंवा कमजोर होणे
* पाण्याचे शोषण व जलरोधकतेचा अभाव
* दबाव सहन करण्याची क्षमता कमी होणे,
* सामग्रीच्या अपूर्ण मिश्रणामुळे टिकाऊपणाचा अभाव,
* कायदेशीर तक्रारी आणि दंडात्मक कारवाई

**५. चाचणी वेळेवर आणि व्यवस्थित केल्याने होणारे फायदे:**

* प्रकल्प वेळेत पूर्ण होणे
* मानवी जीवितहानी व मालमत्तेचे संरक्षण
* ग्राहकांचा विश्वास आणि प्रतिष्ठा वाढवणे
* खर्च आणि वेळेची बचत

**शिकवण आणि पुढील पावले :**

**१. कठोर गुणवत्ता चाचणी :** सिमेंट, स्टील, काँक्रीट मिक्स, फॉर्मवर्क इत्यादींच्या प्रयोगशाळा-मानके (लॅब टेस्ट) वेळेत आणि योग्य पद्धतीने करणे.

**भौ-तकनीकी (जिओ टेक) सर्व्हे :** प्रत्येक प्रकल्पासाठी भूपृष्ठावरील माती व पाण्याची पातळी परीक्षण; foundation design त्यानुसार ठरवणे.

**३. स्ट्रक्चरल ऑडीट :** तृतीय पक्ष (थर्ड पार्टी) वैज्ञानिक अहवाल (peer review) आणि शिफारशी अंमलात आणणे.

**४. नियमांचे पालन :** IS कोड NBC आणि स्थानिक BMC / MHD नियमांचे काटेकोर पालन.

**५. तक्रारी निवारण यंत्रणा :** रहिवाशांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद देणारी प्रणाली (ग्रेव्ही अंन्स रिड्रेसल) त्वरित कार्यान्वित करणे.

खाली राज्यात झालेल्या काही इमारतींच्या अपघाताची माहिती आणि कारणे नमूद केली आहेत :

**१. महाड इमारत दुर्घटना (रायगड, ऑगस्ट २०२०)**

**घटना :** महाड शहरातील तारिक गार्डन ही ५ मजली निवासी इमारत अचानक कोसळली.

**मृत्यू :** किमान १२ लोक ठार, ३० हून अधिक अडकले.

**कारण :**

* कोणतीही स्ट्रक्चरल ऑडीट किंवा लोड टेस्टिंग वेळेवर केली गेली नाही.
* निकृष्ट दर्जाचे काँक्रीट आणि स्टील वापरले गेले.
* आधारस्तंभ आणि बीममध्ये क्रॅक आधीपासून दिसत होते.

**२. पुणे वल्लभनगर भिंत दुर्घटना (जुलै २०१९)**

**घटना :** २३ फूट उंचीची कंपाऊंड भिंत मुसळधार पावसात कोसळली.

**मृत्यू:** १५ स्थलांतरित कामगारांचा मृत्यू.

**कारण :**

* भिंतीच्या foundation साठी कोणतीही माती चाचणी (सॉईल बिअरिंग टेस्ट) केलेली नव्हती.
* सिमेंट-काँक्रीटचा गुणधर्म खड कोडप्रमाणे नव्हता.
* स्ट्रक्चरचे ड्रेनेज डिझाइन चुकीचे होते.

**३. ठाणे मुंब्रा इमारत दुर्घटना (एप्रिल २०१३)**

**घटना :** ७ मजली इमारत कोसळून ती जमिनीवर सपाट झाली.

**मृत्यू :** ७४ लोक ठार, ५० हून अधिक जखमी.

**कारण :**

* परवानगीशिवाय व अयोग्य पद्धतीने बांधलेली इमारत.
* काँक्रीट क्युब टेस्ट, रीब टेस्टिंग, स्लंप टेस्ट वगैरे कोणतीही गुणवत्ता चाचणी केली गेली नाही.
* विकसकांनी स्वस्त व निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले.

**४. नवी मुंबई शाहबाज गाव दुर्घटना ( ऑगस्ट २०२४)**

**घटना :** तीन मजली इमारत अचानक कोसळली.

**मृत्यू :** २ जण ठार, अन्य अनेक अडकले.

**कारण :**

MPCB किंवा CIDCO ने कोणताही स्ट्रक्चरल रिपोर्ट मागितला नव्हता.

* भिंतींमध्ये योग्य प्रमाणात रेइनफोर्समेंट नव्हते.
* काँक्रिटमध्ये पोझोलानिक सिमेंट वापरून स्ट्रेंथ कमी झाली होती.

**५. समृद्धी महामार्ग क्रेन दुर्घटना (ऑगस्ट २०२३)**

**घटना :** बांधकामासाठी वापरलेली क्रेन कोसळून २० मजुरांचा मृत्यू झाला.

**कारण :**

* क्रेनच्या रचना-संरचनेची सुरक्षा चाचणी (लोड टेस्ट सर्टिफिकेशन) झाली नव्हती.
* पायाभूत सुविधा तयार करताना पाईल फाउंडेशन टेस्टिंग आणि भू-तकनीकी सर्वेक्षण व्यवस्थित झाले नव्हते.
* यंत्रसामग्रीची नियमित देखभाल व लेखापरीक्षणाचा अभाव.

**खाली बांधकामातील सर्वात महत्त्वाचे आणि सर्वसामान्यपणे वापरले जाणारे साहित्य आणि त्यांची प्रत्येक नवीन बॅचलॉटसाठी किमान चाचणीची गरज भारतीय मानकांनुसार (आय एस कोड्स) दिली आहे.**



बांधकाम साहित्य गुणवत्तासाठी पुढे नमूद केलेल्या मटेरीअलची प्रत्येक नवीन बॅच/लॉटसाठी चाचणी करणे आवश्यक आहे. सिमेंट (OPC, PPC, PSC), बारीक खडी/ वाळू (फाइन ॲग्रिगेट्स), मोठी खडी (कोर्स ॲग्रिगेट्स), सळई लोखंड (टी एम टी Fe500/550), काँक्रिट (आर एम सी/साइट मिक्स), ईंट (मातीच्या/फ्लाय ॲश), ब्लॉक्स (ए एसी/काँक्रीट) बांधकामासाठी पाणी, ॲडमिक्सचर (रिटायर्डस प्लास्टीसायजर्स), डांबर (बिटूमेन), पेव्हर ब्लॉक्स / कर्ब स्टोन्स, प्लास्टरिंग साहित्य (सिमेंट, लाइम), पेंट आणि कोटिंग्स, स्ट्रक्चरल स्टील (प्लेट्स, चॅनेल्स), फॉर्मवर्क साहित्य

(प्लायवुड, स्टील), क्युरिंग कंपाउंड / वॉटरप्रूफिंग, सिमेंट ग्राऊट, मेटल शीट्स / टिबर्स, सँड / सीमेंट मिक्स (मोर्टार), टाइल्स (सेरामिक / विट्रिफाइड), ग्रॅनाइट/ मार्बल, लोखंडी जाळी / वायर मेष, केबल्स / विद्युत साहित्य, प्लंबिंग साहित्य (पाइप, फिटिंग्स). या सर्व साहित्यांची नवीन बॅच किंवा लॉटसाठी चाचणी करणे आवश्यक आहे, जेणेकरून साहित्याची गुणवत्ता आणि सुरक्षा सुनिश्चित होईल.

या प्रत्येकासाठी विविध खड कोड्स वापरले जाणारे आहेत, परंतु प्रकल्पाच्या गरजेनुसार अधिक तपशीलवार चाचणी योजनाही लागू शकते. चाचणी अहवाल नीट सांभाळा आणि प्रोजेक्टच्या गुणवत्ता नियंत्रणासाठी वापरा.

**निष्कर्ष :** वरील सर्व माहितीवरून एक महत्वाची गोष्ट निष्पन्न होते कि इमारती अथवा कुठल्याही स्ट्रक्चरच्या सुरक्षिततेसाठी आपण वापरत असलेल्या बांधकाम साहित्याची गुणवत्ता चाचणी करणे अत्यावश्यक आहे.

**नगर जिल्ह्यातील बांधकाम गुणवत्तेचा आधारस्तंभ :** इंजिनिअर राजाराम पुजारी आणि स्ट्राँगटेक इंजिनिअरिंग सर्व्हिसेस. बांधकाम क्षेत्रात गुणवत्ता, पारदर्शकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा एकत्रित अवलंब करणारी संस्था म्हणजे स्ट्राँगटेक इंजिनिअरिंग सर्व्हिसेस ॲण्ड रिसर्च प्रा. लि. या संस्थेचे संस्थापक इंजिनिअर राजाराम पुजारी यांनी नगर जिल्ह्यासह महाराष्ट्रात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही अत्यंत विश्वासार्ह आणि आधुनिक चाचणी प्रयोगशाळेची स्थापना केली आहे. राजाराम पुजारी यांनी बी ई सिव्हील पूर्ण केल्यानंतर पुणे विद्यापीठ येथून एम टेक देखील पूर्ण केले आहे. त्यांच्या अनुभवातून त्यांनी स्ट्राँगटेकला एक प्रगत तंत्राधिष्ठित संस्था बनवली आहे.

**स्ट्राँगटेक इंजिनिअरिंग सर्व्हिसेस –** गुणवत्ता आणि विश्वासाचा प्रतीक आहे. हि संस्था २०१३ पासून कार्यरत असून स्ट्राँगटेक ही संस्था महाराष्ट्रातील आघाडीची ISO / IEC 17025:2017 प्रमाणित व NBL मान्यताप्राप्त चाचणी प्रयोगशाळा आहे. विविध प्रकारच्या साहित्य चाचण्यांसाठी ती प्रसिद्ध आहे जसे कि काँक्रीट, सिमेंट, स्टील, विटा, माती, रस्ता साहित्य, पाणी चाचण्या, स्ट्रक्चरल ऑडीट, जिओटेक्निकल इन्वेस्टीगेशन, नॉन डीस्ट्रक्टीव्ह टेस्टिंग, क्वालिटी कंट्रोल कंन्सलटंन्सी, एम ई पी ऑडीट मिक्स डिझाइन इ.

**शाखांचे जाळे –** महाराष्ट्र ते दुबईपर्यंत : स्ट्राँगटेकचे पुणे (मुख्य कार्यालय) व नगर, तसेच मुंबई, सांगली, कोल्हापूर, सोलापूर व दुबई येथे शाखा कार्यरत आहेत.

**नगर शाखेचा पत्ता :**

**स्ट्राँगटेक इंजिनिअरिंग सर्व्हिसेस –** नगर शाखा, दौंड रोड, व्ही आर डी ई समोर, अहिल्या नगर ०३.

**स्ट्राँगटेकचे तांत्रिक वैशिष्ट्ये :** NBL मान्यता व ISO प्रमाणपत्र, आधुनिक यंत्रणा व प्रशिक्षित अभियंते, वैयक्तिक व शासकीय प्रकल्पांकरिता विश्वासार्ह चाचण्या, ऑन साईट टेस्टिंग, थर्ड पार्टी चाचणी आणि सल्ला सेवा.

**– इंजि. राजाराम पुजारी, मोबा.नं. ९८९००५९८८४**
**Email ID - admin@strongtech.in**
**Web : www.strongtech.in**

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

# अतिसारामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी सुकाणू समितीची बैठक



पावसाळ्यात उद्भवणाऱ्या डेंग्यू, झिका, मलेरिया आदी साथजन्य आजारावर उपाययोजनांबाबत मनपाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. (छाया – लहू दळवी

नगर – राज्यातील बालमृत्यू कमी करण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपाय योजना व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. देशात पाच वर्षाखालील मुलांच्या अतिसारामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण हे ४.८ टक्के आहे. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने Stop Diarrhoea Campaign 2025 – अतिसार रोखा मोहीम २०२५ सुरू केली असून ही मोहीम राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी सुचित केले आहे. शासन निर्देशानुसार अहिल्यानगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अतिसार रोखा मोहीम २०२५ यशस्वीरित्या राबवण्यासाठी महापालिकास्तरीय सुकाणू समितीची बैठक उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. बालकांमध्ये उद्भवणाऱ्या अतिसाराच्या समस्या रोखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याबाबत या सुकाणू समतीच्या बैठकीत सूचना देण्यात आल्या.

याचबरोबर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या डेंग्यू, झिका, मलेरिया आदी साथजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी महानगरपालिका आरोग्य विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीष राजुरकर, प्रवीण ढगे, जे. एन. पठाण, डॉ. सी. डी. मिश्रा, डॉ. उज्वला शिरसाठ, डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. आयेशा शेख, डॉ. गिरीश दळवी, डॉ. वृषाली आरु, डॉ. कांचन रच्चा, डॉ. शिल्पा चेलवा, डॉ. रजत येवले, डॉ. निलोफर धानोरकर, डॉ. सारंग बोरुडे, डॉ. स्मिता म्हस्के, डॉ. आशिषकुमार इंगळे, डॉ. नितीन जगताप, डॉ. प्रशांत पवार, डॉ. प्रतिभा राऊत, भाऊसाहेब सुडके आदी उपस्थित होते.







## एकनाथ थोरात घरातून बेपत्ता



नगर – नगर जिल्ह्याच्या सरहद्दीवरील हातोळण (ता. आष्टी, जि. बीड) येथील एकनाथ शिवराम थोरात (वय ५०) घरातून बेपत्ता झाले आहेत. २५ मे २०२५ रोजी घरी कोणाला काही न सांगता निघून गेले आहेत. याबाबत अंभोरा पोलिस ठाण्यात (ता. आष्टी) मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. कोणाला माहिती मिळाल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकती विद्यमान मालक **श्री.प्रमोद सुधाकर गायकवाड,** रा. मल्हार चौक, आनंद नगर, अहिल्यानगर यांचे मालकी वहिवाटीच्या आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन सदरचा मिळकतीचा खरेदी विक्रीचा करारनामा आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व व्यवहारापोटी विसार म्हणून रक्कम सुध्दा घेतलेली आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाई हुकुम, दावा कोर्ट कारवाई बॅक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णन** -

डि।। अहिल्यानगर सब डि।। ता. नगर पैकी मौजे नालेगांव येथील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत –

**स.नं.४६/२ यातील प्लॉट नं. १२+१३/१ याचे क्षेत्रफळ ५८३.१२ चौ. मी यात बांधलेल्या आयकॉन टॉवर या इमारतीमधील स्टील्ट ग्राऊंड फ्लोअरवरील फ्लॅट नं. २ याचे बाल्कनीसह कारपेट क्षेत्र ५९.१२ व बिल्टअप क्षेत्र ७३.९० चौ. मी. मिळकतीबाबत.**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – ओपन टु स्काय | दक्षिणेस – ओपन टु स्काय
पश्चिमेस – दुकान नं. ४ | उत्तरेस – फ्लॅट नं. १

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. ३१/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. हर्षद आर. कटारिया**
२०८, करण कोर्ट बिल्डींग, जुन्या कोर्टासमोर,
दादा चौधरी शाळेजवळ, अहमदनगर
मो. ९८८१३७७७७२

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे **विद्यमान मालक १. प्रयागा नामदेव पावार (आधार कार्ड प्रमाणे) परीगा नामदेव पवार (७/१२ उताऱ्या प्रमाणे) रा. उघड मळा,वडगाव गुप्ता, अहमदनगर. २. सविता संजय झावरे रा. हिंगणगाव, अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन विद्यमान मालक यांनी सदर जमीन विक्री करण्याची बोलणी करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज,गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर, पोट तुकडी तालुका नगर, पैकी अहिल्यानगर / अहमदनगर जिल्हा परिषद पैकी पंचायत समिती पैकी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे **नागरदेवळे** येथील मे. सब रजिस्ट्रार साहेब, अहिल्यानगर / अहमदनगर यांचे हद्दीतील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| ग. नं. | हे. आर. | आकार |
|---|---|---|
| ११३/१ | ३.५५ | ४.४० |
| पोख | ०.०७ | |
| | ३.६२ | |

या पैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची अविभक्त हिश्याच्या १ हे १८ आर जमीन मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – ९.०० मीटर रस्ता व भिंगार शिव | दक्षिणेस – गट नंबर पैकी
पश्चिमेस – ओढा | उत्तरेस – गट नं. ११३/२ चा एन. ए. लेआऊट

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. ३१/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

दिनांक ३१/०५/२०२५

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की. खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही आमचे आशिलाचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून सदर मिळकती बाबत आमचे आशिलांनी अहमदनगर येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर यांचे कोर्टात स्पे.मु. नंबर ४१/२०२३ चा दावा सदर मिळकतीचे अग्रहक्काने खरेदीखत लिहून नोंदवून मिळणेसाठी, जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केलला असून सदर दाव्याचे कामकाज न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यान आमचे आशिलांनी सदर दाव्यातील नि. ५ चे आदेशा विरुध्द अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयामध्ये कि. सि. अपिल नं. १७० / २०२४ चे दाखल केलेले असून ते देखील न्यायप्रविष्ठ आहे. असे असतांनाही १) सागर आबासाहेब निमसे रा. बुऱ्हाणनगर, ता. जि. अहमदनगर हे खालील परिशिष्टा मधील मिळकती बाबत बेकायदेशिररित्या आमचे आशिलाचे हक्क डावलून खरेदी विक्री अगर अन्य मार्गाने हस्तांतर करण्याचे प्रयत्नात असून तशा त्यांच्या जोरदार हालचाली सुरु झाल्याचे खात्रीलायक रित्या समजले आहे, तरी खालील परिशिष्टात नमुद मिळकतीशी कोणीही कोणतेही प्रकारे खरेदी विक्री गहाण, दान, लिज, लिन, साठेखत वगैरे मार्गाने हस्तांतराचे व्यवहार करु नयेत, सदर मिळकतीवर कोणत्याही बँक, पतसंस्था, फायनान्स कंपनी आदी वित्तीय संस्थेने कर्जाचा बोजा निर्माण करु नये, या उपर काही व्यवहार केल्यास मिळकत घेणारास कोणतेही मालकी हक्क प्राप्त होणार नाहीत याची नोंद घ्यावी, केवळ कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरची नोटीस प्रसिध्द केली असे.

**- परिशिष्ठ -**

**मिळकतीचे वर्णन:-**

जिल्हा अहमदनगर सब जिल्हा तालुका नगर पैकी मौजे धनगरवाडी शिवारातील शेतजमीन मिळकत :-

| गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. – पैसे | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ३/३ | १-२० | १-८७ | रस्ता | ओढा | २/२ | रस्ता |

० हे ८० आर क्षेत्र वाद विषय आहे.

येणेप्रमाणे चतुः सिमापूर्वक शेतजमीन मिळकत या मधील बांध बंदीस्ती, झाडे झुडपे वाग वहिवाटीचे हक्कासह इत्यादी तदंगभुत वस्तुंसह वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कासह खाली काही एक राखून न ठेवता.

आमचे आशिल
श्रीमती सिताबाई छगन जामदारे

**ॲड. राजेंद्र पनालाल शेलोत**
पंचमी टॉवर्स, दिल्लीगेट, देशमुख गल्ली,
अहमदनगर मो.नं. ९४२२२२३४४१

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यादेवींचे भव्य स्मारक व १०० फुटाचा पुतळा नगरमध्ये उभारणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन



विचार भारती व जनसेवा फाउंडेशन आयोजित अहिल्यानगर गौरव दिनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे.

नगर – अहिल्यानगर ही जशी संतांची भूमी आहे तशीच अहिल्यादेवींसारख्या वीरांचीही भूमी आहे. सांस्कृतिक व साहित्यिक म्हणूनही जिल्ह्याची ओळख आहे. अहिल्यादेवी होळकरांच्या ३०० व्या जयंती वर्षात नगरचे नामांतर अहिल्यानगर झाल्याचा विशेष आनंद होत आहे. धर्म, न्याय सामाजिक सुधारणा म्हणजे अहिल्यादेवींची ओळख आहे. स्त्री सक्षमीकरणाचा पाया अहिल्यादेवींनी घातला त्यामुळे पूर्ण देशात त्यांच्या गौरव झाला आहे. अहिल्यादेवींच्या विचारांची व कार्याची प्रेरणा मिळावी म्हणून महिला सबलीकरणाचे प्रतीक म्हणून अहिल्यादेवींचे भव्य स्मारक व १०० फुटाचा पुतळा अहिल्यानगरमध्ये उभारण्यात येणार आहे. नगर शहराच्या पर्यटनाला चालना मिळण्यासाठी हा वुमन इम्प्रूमेंट स्टॅच्यू उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्म शताब्दी निमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन माऊली सभागृह येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाले. यावेळी महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे, कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे, बाबासाहेब वाकळे, विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी, रत्नमाला लंघे, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, विचार भारतीचे सुधीर लांडगे, अनिल मोहिते, महेंद्र जाखेटे, उदय भणगे, अहिल्यानगर गौरव गीताचे निर्माते गौतम मुनोत, चंद्रकांत तागड आदींसह माजी नगरसेवक, पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

मंत्री विखे पुढे म्हणाले, विचार भारती व जनसेवा फाउंडेशनने अहिल्यानगर गौरव दिनाचे आयोजन करून अहिल्यादेवींचे कला व कलाकारांना उत्तेजन देण्याचे कार्य पुढे नेले आहे. विचार भारतीचे विचार नगरकरांना पटले असल्यानेच ३ दिवस चालणाऱ्या या महोत्सवास प्रतिसाद नगरकरांनी दिला असल्याने अहिल्यानगर गौरव दिन हा लोकोत्सव झाला आहे. त्यामुळे विचार भारतीची व जनसेवा फाउंडेशनची जबाबदारी वाढली असून पुढील वर्षी अजून उत्तमोत्तम कार्यक्रमांचे आयोजन करावे लागणार आहे. प्रारंभी अहिल्यानगर गौरव दिनाचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी केले. उपाध्यक्ष अनिल मोहिते यांनी विचार भारतीची माहिती दिली. अशोक गायकवाड यांनी आभार मानले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात अहिल्यानगर गौरव गीताचे निर्माते गौतम मुनोत, संगीतकार नीरज करंदीकर, गीतकार संजय धोत्रे, गायिका अपूर्वा निषाद आदींचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच घेण्यात आलेल्या वक्तृत्व व चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे संयोजक प्रा.अशोक सागडे व अशोक डोळसे तसेच शोभायात्रेचे संयोजक उदय भणगे यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला.

यावेळी माजी नगरसेवक निखिल वारे, अनिल बोरुडे, धनंजय जाधव, आशा कराळे, वंदना ताठे, सतीश शिंदे, संपत नलावडे, रवींद्र बारस्कर, अजय चितळे, पल्लवी जाधव, संजय ढोणे, रामदास आंधळे आदींसह रसिक उपस्थित होते. उद्घाटनानंतर सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात अहिल्यानगरच्या वैभवशाली इतिहास संस्कृतीचे सादरीकरण करणारा जागर अहिल्यानगरीचा हा उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यकम स्थानिक कलाकारांनी सादर केला. यामध्ये गायन, वादन, नृत्य, अभिनय अशी बहुरंगीकला सादर केली.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा सर्व शासकीय कार्यालयात लावावी अशा मागणीचे निवेदन भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष श्रीमती चित्राताई वाघ यांना देताना भाजपच्या जिल्हा सरचिटणीस सविता कोटा यांच्यासह महिला पदाधिकारी.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा सर्व शासकीय कार्यालयात लावावी

## भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष श्रीमती चित्राताई वाघ यांच्यासह मुख्यमंत्री यांना निवेदन

नगर – सर्व शासकीय कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा असावी, या मागणीचे निवेदन भाजपच्या महिला प्रदेश अध्यक्षा चित्राताई वाघ यांना भाजपचे जिल्हा सरचिटणीस सविता कोटा यांनी दिले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष जयश्रीताई अहिरराव, प्रदेश सचिव गीताताई गिल्डा, महिला अध्यक्षा प्रिया जानवे, लीलावती अगरवाल, कालिंदीताई केसकर, रेखा मेड, संध्याताई पावसे, राखी आहेर, नीता फाटक, सुरेखा जंगम, संध्या पावसे, छायाताई राजपूत, मीराताई सरोदे, सुजाता औटी आदी उपस्थित होते. तसेच शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले आहे.

महाराष्ट्रासह देशभरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी शताब्दी साजरी होत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य संपूर्ण देशात व देशातील कानाकोपऱ्यात सरकारच्या माध्यमातून पोहचवले जात आहे. हे कार्य निरंतर सुरू राहणार असून, या कार्याचा एक भाग म्हणून सर्व शासकीय कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अहिल्यादेवी होळकर यांनी देशासाठी, सर्व महिलांसाठी, धर्मासाठी व मंदिरांसाठी प्रेरणादायी कार्य केले आहे त्यांचे कार्य हे निरंतर असेच तेवत ठेवण्यासाठी व त्यांची प्रेरणा घेऊन आदर्श असा समाज उभा राहणार आहे. त्यांच्या कार्याची व विचारांची प्रेरणा मिळण्यासाठी त्यांच्या प्रतिमा सर्व कार्यालयात लावण्याचे आदेश निर्गमीत करण्याचे निवेदनात म्हटले आहे.

# बूथ हॉस्पिटलचे मेजर देवदान आणि मेजर ज्योती कळकुंबे यांचा नगरमध्ये २ जूनला सन्मान सोहळा



नगर – कोरोना नैसर्गिक आपत्ती महामारीच्या संकटकाळात आरोग्यसेवा, प्रशासन आणि माणुसकी यांचे जिवंत प्रतीक ठरलेल्या अहिल्यानगर येथील बूथ हॉस्पिटलमध्ये प्रशासक म्हणून कार्यरत असलेले मेजर देवदान कळकुंबे आणि मानव संसाधन प्रमुख म्हणून आपली जबाबदारी निभावणाऱ्या मेजर ज्योती कळकुंबे यांची नुकतीच मुंबई येथे नियुक्ती झाली. त्यानिमित्त त्यांच्या कार्याविषयी समस्त नगरकरांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने मेजर देवदान कळकुंबे आणि मेजर ज्योती कळकुंबे यांचा सन्मान सोहळा २ जून रोजी सकाळी ११ वा. बूथ हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

कोरोना महामारीच्या काळात या दोघांनी बूथ हॉस्पिटलमधून हजारो रुग्णांना जीवदान दिले. औषधोपचार, मनोबल, आणि व्यवस्थापन या सर्व पातळ्यांवर त्यांनी आपले कर्तव्य न फक्त प्रामाणिकपणे बजावले, तर त्यात मानवी संवेदना आणि आत्मीयता यांचीही प्रचीती दिली. अनेक वेळा स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता त्यांनी रात्रंदिवस सेवा देत हॉस्पिटल व्यवस्थापनाचा एक नवीन आदर्श समाजापुढे मांडला. त्यांची ही सेवेची भावना आणि कठोर परिश्रम आजही नगरकरांच्या हृदयात घर करून आहेत.

या सन्मान सोहळ्यात नगरमधील डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक सोहळ्याला नगरकरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संध्या मेढे, ॲड. संतोष गायकवाड, सॅम्युअल वाघमारे, भैरवनाथ वाकळे, प्रवीण साबळे, युनुसभाई तांबटकर, सत्यशील शिंदे यांनी केले आहे.

# नगरचे ठाकूरदास परदेसी यांनी महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचा इतिहास व सौंदर्य चित्रातून मांडला

### डॉ. कमर सुरुर यांचे प्रतिपादन



अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त सर्जेपुरा येथील रहमत सुलतान सभागृहात आयोजित ठाकूरदास परदेसी यांच्या चित्रांचे प्रदर्शनामध्ये जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर यांच्यासह इतिहासप्रेमी.

## अहमदनगर शहर स्थापना दिनानिमित्त ठाकूरदास परदेसी यांचे गडकिल्ले चित्र प्रदर्शन

नगर – गड किल्ल्यांचा संपूर्ण देशाला मोठा इतिहास आहे. जुने तंत्रज्ञान जाणून घेण्यासाठी राजे महाराजे यांनी बांधलेले महाल किल्ले एक उत्तम साधन आहे. आज एवढे तंत्रज्ञान असून सुद्धा जुन्या काळातील तो टिकाऊपणा व सौंदर्य नवीन वास्तूंना येत नाही. उलट नवीन पिढी सुद्धा जुन्या वास्तूंचा सुंदरपणा आपल्या नवीन वास्तूमध्ये आणण्याचा प्रयत्न करतात. अशा या वास्तूंची भ्रमंती करून ठाकूरदास परदेसी यांनी महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचा सौंदर्य आपल्या कॅमेऱ्यात कैद करून तो चित्राच्या रूपाने आपल्यासमोर मांडला आहे, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर यांनी केले.

मख़दुम सोसायटी, रहमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्रातील दोनशे पेक्षा जास्त गड किल्ल्यांची भ्रमंती करणारे ठाकूरदास परदेसी यांच्या चित्रांचे प्रदर्शन सर्जेपुरा येथील रहमत सुलतान सभागृहात आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. कमर सुरुर बोलत होत्या. यावेळी रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, संध्याताई मेढे, क्वाईन संग्रहक सचिन डागा, पंकज मेहेर, डॉ. परवेज अशरफी, मुस्कान असोसिएशनचे शफकत सय्यद, फिरोज शेख, आर्किटेक फिरोज शेख आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. कमर सुरुर म्हणाले की असे प्रदर्शन नेहमी आयोजित होणे गरजेचे आहे. यामुळे नवीन पिढीला आपला इतिहास जाणून घ्यायची संधी मिळते. व ज्यांनी प्रत्यक्ष गड किल्ले बघितले नाहीत ते या चित्रांचे माध्यमातून व त्यांच्या संग्रहका कडून बरीच माहिती मिळवता येते असे सांगितले. चित्र प्रदर्शनास मोठा प्रतिसाद मिळाला. लोकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. सूत्रसंचालन आबीद खान यांनी केले. शफकत सय्यद यांनी आभार मानले.



# शीख समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करा

## राज्यातील शीख समाजाचे अनेक घटक आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले असल्याचा दावा

नगर – शीख समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी जिल्ह्यातील शीख समाजाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील शीख समाजाचे अनेक घटक अजूनही आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत. या समाजातील नागरिकांच्या सर्वांगीन विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती झाल्यास अल्पसंख्याकांसाठी असलेल्या कल्याणकारी योजना शीख समाजालाही न्याय देतील. अलीकडेच जैन समाजासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करून एक ऐतिहासिक निर्णय घेतला, त्याचे शीख समाज स्वागत करत आहे. त्याच धर्तीवर शीख समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची गरज आहे.

पूर्वी अल्पसंख्याक आर्थिक महामंडळात या समाजांचा समावेश होता, परंतु बहुतेक अल्पसंख्याक योजना फक्त एका विशिष्ट समुदायास अधिक लाभदायक ठरत आहेत. परिणामी शीख समाज दुर्लक्षित राहत आहे. म्हणून, या समाजाला उद्दिष्ट ठेऊन स्वतंत्र महामंडळ स्थापन करणे ही काळाची गरज बनली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

सिंधी आणि पंजाबी समाज हिंदू समुदायाचा भाग असला तरी त्यांचा समावेश अल्पसंख्याक महामंडळात झालेला नाही. मात्र, हे दोन्ही समाज श्री गुरु ग्रंथ साहिबजी यांच्यावर श्रद्धा ठेवतात आणि शीख समाजासोबत समान सांस्कृतिक परंपरा पाळतात. त्यामुळे या दोन्ही समाजांचा समावेश प्रस्तावित महामंडळात करण्यात यावा.

शीख समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करुन त्याच्या माध्यमातून अल्प व्याजदराने कर्ज सुविधा मिळावी, व्यवसाय व रोजगार प्रशिक्षण योजना, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्ज, महिलांसाठी विशेष आर्थिक योजना, कृषी क्षेत्रात कार्यरत नागरिकांसाठी मदतीच्या योजना, विद्यमान अल्पसंख्याक आयोगाच्या निधीपैकी एक भाग यामध्ये वापरला जावा, याचा प्रारंभ महाराष्ट्रापासून व्हावा, या महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे असावे व प्रत्येक जिल्ह्यात शाखा सुरू करून लाभप्राप्ती सुनिश्चित करावी, महाराष्ट्रात स्वतंत्र शीख कल्याण आयोगाची तातडीने स्थापना करावी, जेणेकरून शीख समाजाला सरकारी योजनांचा समतोल लाभ मिळण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागणीसाठी हरजीतसिंग वधवा, जनक आहुजा, लकी सेठी, प्रितपालसिंग धुप्पड, गुरबच्चनसिंग चुग, राजेंद्र कंत्रोड, सरबजितसिंघ सेठी, गुलशन कंत्रोड, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, सनी वधवा, सीमरजितसिंग वधवा, करणसिंग धुप्पड, हरदीपसिंग कथुरिया, सनमितसिंघ चुग, रणजीतसिंग ठकराल, राजा नारंग, मनोज मदान, किशोर रंगलानी, मंजितसिंघ चुग, कन्हैया कुकरेजा, राहुल बजाज, राजकुमार बत्रा, मन्नू कुकरेजा आदी प्रयत्नशील आहेत.

# अहिल्यानगर पीठ गिरणी संघटनेतर्फे १ जूनपासून दळणाच्या भावात वाढ

नगर – अहिल्यानगर मनपा हद्द पीठ गिरणी संघटनेने आधीच जाहिर केल्या प्रमाणे म्हणजे १ जूनपासुन दळणाच्या भावात वाढ होत आहे. यापुढे गहु, ज्वारी, बाजरी ७ रुपये किलो तर दाळी, रवा, तांदुळ १२ रुपये किलो व मका, नाचनी, भरड़ा, एस्सर इतर १५ रुपये किलो प्रमाणे असणार आहे. वाढीचे भाव फलक संघटनेचे पदाधिकारी व प्रत्येक प्रभागातील समिती सदस्य यांच्या मार्फत गिरणी मालक व चालक यांच्या कड़े पोहोच करण्यात आलेले आहे, अशी माहिती संघटनेचे मार्गदर्शक पंडित खरपुड़े यानी दिली.

यावेळी बोलताना संघटनेचे अध्यक्ष रामकिसन सुपेकर यांनी सांगितले की प्रत्येक गिरणी चालक किंवा मालक यांच्याकडून संघटनेची सदस्य फी व भाव फलक फी म्हणून ३०० रुपये आकारण्यात आलेले आहे. या पैशांचे व्यवस्थित हिशोब ठेवण्यात येणार असल्याची माहिति त्यांनी दिली.

तसेच प्रत्येक पीठ गिरणी चालक मालक या सर्वांनी संघटनेने ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच भाव घ्यावा व कुठल्याही अपप्रचाराला बळी पडु नये जर कोणाला काही तक्रार असेल तर त्यांनी आपली तक्रार लेखी स्वरुपात संघटनेचे अध्यक्ष रामकिसन सुपेकर यांच्या कड़े दयावी असे आवाहन कार्याध्यक्ष अकबर पठाण यांनी केले आहे.

जर पीठ गिरणी चालक किंवा मालक यांना भाव फलक भेटले नसतील तर त्यांनी संघटनेचे सल्लागार हाजी ज़मीर शेख ९२२६४३२८६३ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन संघटनेतर्फे करण्यात आलेले आहे.



शीख धर्माचे पाचवे गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूर येथे गुरुनानक देवजी (जीएनडी) ग्रुपच्या वतीने नागरिकांना लंगर (प्रसाद) व सरबतचे वाटप करताना गुणे आयुर्वेदिक महाविद्यालयचे अध्यक्ष सचिन जगताप

# गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त अहिल्यानगर शहरात लंगर व सरबतचे वाटप

नगर – शीख धर्माचे पाचवे गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूर येथे गुरुनानक देवजी (जीएनडी) ग्रुपच्या वतीने नागरिकांना लंगर (प्रसाद) व सरबतचे वाटप करण्यात आले. गुणे आयुर्वेदिक महाविद्यालयचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते प्रसाद वाटपाला प्रारंभ झाले.

या कार्यक्रमा प्रसंगी जनक आहुजा, संजय आहुजा, जितू गंभीर, राकेश गुप्ता, किशोर कंत्रोड, मॉन्टी तलवार, गुरली अवतार, करण आहुजा, परभ गुलाटी, मनीष खुराना, विकी कंत्रोड, रोहित बत्रा, काजल गुरु, राजेश कंत्रोड, कुणाल गंभीर, गिरीश खन्ना, विजय मनोचा, सागर कुमार, अक्षय खुराना आदी उपस्थित होते.

सचिन जगताप म्हणाले की, गुरू अर्जुन देव मानवतेचे खरे सेवक व धर्माचे रक्षक ठरले. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी लोकांची सेवा केली. तर अन्यायापुढे न झुकता शहिद झाले. अमानुष छळ सहन करुन धर्माप्रती ते निष्ठावान राहीले. शीख धर्मासाठी शहीद होणारे पहिले गुरू म्हणून ते अजरामर झाले. त्यांचे हौतात्म्य हे शीख धर्माच्या इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. त्यांचे बलिदान आजही समाजासाठी प्रेरणा असल्याचे त्यांनी सांगितले.

जनक आहुजा म्हणाले की, गुरु अर्जुन देवजी यांनी अमृतसर येथे असलेल्या गुरु रामदास सरोवरचे काम पूर्ण केले. शीख धर्मात असलेले गुरु ग्रंथ साहेब यांनी लिहून पूर्ण केले व त्याबाबत जनजागृती केली. ही जनजागृती मुघल साम्राज्याला बाधा आणणारी ठरल्याने त्यांनी गुरु अर्जुन देवजी यांचा अमानुषपणे छळ केला. धर्मासाठी त्यांनी अन्यायापुढे न झुकता आपली शहिदी दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## क्रीडा प्रशिक्षण केंद्रांतर्गत १ जूनपासून प्रशिक्षण शिबीर

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, अहिल्यानगर यांच्यामार्फत ८ ते १४ वयोगटातील तसेच वरिष्ठ गटातील खेळाडूंसाठी प्राथमिक व अद्यावत प्रशिक्षण शिबीराचे १ ते १० जुन या कालावधीत सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. खेळाडूंनी शिबीरात सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

जिल्ह्यात खेळाचा प्रचार, प्रसार होऊन गावपातळीपासून चांगले खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. खो–खो खेळाचे शिबीर एकलव्य क्रीडामंडळ, निर्मलनगर, अहिल्यानगर व बाबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर, शेवगाव येथे होणार असून बॅडमिंटन व कुस्ती या खेळाचे प्रशिक्षण शिबीर जिल्हा क्रीडा संकुल, वाडियापार्क, अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले आहे. माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्याशी संपर्क साधावा.



कल्याण रोड परिसरातील सुरु असलेल्या नवीन पुलाचे काम मागील अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने याबाबत शहर शिवसेनेच्या वतीने राष्ट्रीय महामार्गाचे उपअभियंता अजित गायके यांना निवेदन देवुन घेराव घालण्यात आला.

# कल्याण रोडवरील पुलाचे काम तातडीने सुरू करा अन्यथा शिवसेना पद्धतीने तीव्र आंदोलन करणार

नगर – अहिल्यानगर शहरातील कल्याण रोड परिसरातील सीना नदीवर बांधण्यात येत असलेल्या नवीन पुलाचे काम त्वरित सुरू करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात शहर शिवसेनेच्यावतीने राष्ट्रीय महामार्गाचे उपअभियंता अजित गायके यांना निवेदन देवुन त्यांना घेरावा घालण्यात आला. व लवकरात लवकर या पुलाचे काम सुरु करावे. अन्यथा शिवसेना पद्धतीने आंदोलन केले जातील. तसेच सदर ठेकेदाराचे बील अदा करु नये, व आगाऊ बील देव नये अशी ही मागणी संभाजी कदम यांनी केली.

यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, संजय शेंडगे, बाळासाहेब बोराटे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, संतोष गेनप्पा, दिपक खैरे, प्रशांत गायकवाड, परेश लोखंडे, बबलु शिंदे, संदिप दातरंगे, अशोक दहिफळे, संजय आव्हाड, अरुण झेंडे, सुरेश क्षीरसागर, आण्णा घोलप, अंगत महानवर, प्रताप गडाख आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

सचिन जाधव म्हणाले की, कल्याण रोड हा मार्ग नेशनल हायवे–६१ वरून जातो. त्यामुळे या भागात वाहतूक सतत सुरू असते. सध्याचा पुल निकृष्ट अवस्थेत आहे, त्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेस अपघाताची शक्यता अधिक आहे. त्यामुळे नागरिकांनी या पुलाचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी बाळासाहेब बोराटे, शाम नळकांडे, सचिन शिंदे आदींनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. काम लवकरात लवकर सुरु करावे व सध्या त्या भागात लाईटची व्यवस्था करण्यात यावी, याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. तसेच परिसरात आपत्ती उद्भवल्यास कुठलीही व्यवस्था करण्यात आलेली नाही.

निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, सध्याची परिस्थिती कायम राहिल्यास नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. तसेच, पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. यासोबतच, प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने निर्णय घ्यावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

# राष्ट्राच्या उभारणीसाठी महिलांची सजग भूमिका अत्यावश्यक : काजल हिंदुस्तानी

नगर – नारीशक्ती म्हणजे केवळ व्यक्तिगत प्रगती नव्हे, तर समाज आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी महिलांची सजग भूमिका अत्यावश्यक आहे, हिंदू महिलांनी स्वतःच्या अस्तित्वाचे भान ठेवून अन्यायाविरुद्ध उभे राहिले पाहिजे. धर्म, संस्कृती, आणि परंपरेचा सन्मान राखताना आपल्या कुटुंबाचा, समाजाचा व राष्ट्राचा बचाव करण्यासाठी प्रत्येक महिलेला सज्ज राहणे आवश्यक आहे. शिक्षण, स्वावलंबन, आणि सामर्थ्य यांच्या माध्यमातून हिंदू महिलांनी स्वतःला सक्षम करणे, समाजातील चुकीच्या प्रवृत्तींना थोपवणे हेच काळातील राष्ट्रसेवा आहे, असे प्रतिपादन श्रीमती काजल हिंदुस्तानी (दीदी) यांनी केले.

सकल राजस्थानी समाज एवम गुजराती समाज आयोजित लाठी काठी प्रशिक्षण शिबिराच्या समारोपात काजल हिंदुस्तानी यांनी 'नारी शक्ती, राष्ट्र शक्ती' या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप उद्योजक नरेंद्र फिरोदिया, जितेंद्र बिहाणी, गौतम मुनोत, कमलेश भंडारी, शैलेश मुनोत, राजेश भंडारी, प्रकाश भागानगरे, आर.डी.मंत्री आदी उपस्थित होते. प्रारंभी गणेश वंदना सादरीकरण करुन प्रतिमापुजन व दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी भारत माता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, जिजामाता, आनंदऋषीजी महाराज, येसूबाई, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा जयघोष करुन अभिवादन करण्यात आले.

काजल हिंदुस्तानी दीदी म्हणाल्या, आजच्या काळात महिलांनी केवळ कौटुंबिक जबाबदाऱ्या नव्हे तर राष्ट्र उभारणीच्या कामातही पुढाकार घेतला पाहिजे. आपल्या अधिकारांची जाण असणे, शिक्षण, स्वावलंबन आणि नेतृत्व क्षमता यांचा विकास करणे हेच खरी नारीशक्ती आहे. महिला सक्षम झाल्या तरच देश प्रगतिपथावर जाईल. समाजातील प्रत्येक घटकाने महिलांचा सन्मान केला पाहिजे आणि त्यांना पुढे जाण्यास संधी दिली पाहिजे.

**सकल राजस्थानी समाज एवम गुजराती समाज आयोजित लाठी काठी प्रशिक्षण शिबीराचा समारोप**



सकल राजस्थानी समाज एवम गुजराती समाज आयोजित लाठी काठी प्रशिक्षण शिबिराच्या समारोपात काजल हिंदुस्तानी दीदी यांनी 'नारी शक्ती, राष्ट्र शक्ती' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यकुशलतेने आणि समाजासाठी अहिल्याबाई होळकर यांनी केलेल्या कार्याने महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशाला प्रेरणा दिली आहे. महिलांनी त्यांचा आदर्श ठेवून समाजात सकारात्मक बदल घडवायला हवा. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला हवा आणि समाजात त्यांचा सन्मान राखला गेला पाहिजे, असे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी यांनी या कार्यक्रमाच्या उद्देशावर प्रकाश टाकताना सांगितले की, आजच्या काळात महिलांनी केवळ शारीरिक आरोग्यच नव्हे तर स्वसंरक्षणाचीही तयारी केली पाहिजे. स्त्रियांना लाठी–काठी प्रशिक्षण दिल्यास त्यांना आत्मविश्वास प्राप्त होईल आणि संकटसमयी स्वतःचा बचाव करण्याची क्षमता निर्माण होईल. हा शिबिराचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांना स्वसंरक्षणाची कला शिकवणे आणि त्यांच्यातील नारीशक्तीला जागृत करणे हा आहे, असे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणात २०० मुली व महिलांनी सहभाग नोंदवुन स्वसंरक्षणाचे धडे घतले. पुणे येथील शिवाजीराजे मर्दानी आखाडा यांच्यावतीने लाठी–काठी, दानपट्टा, तलवार बाजी, युद्धभूमीवरील प्रत्यक्ष लढत आदींचे प्रत्याक्षिके सादर करण्यात आली. तसेच अनुष्का फिल्म प्रोडक्शनच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या अहिल्यानगर नामांतरावरील शॉर्ट फिल्म दाखविण्यात आली. अहिल्यानगर शहरावर तयार करण्यात आलेल्या गौरव गितचे सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवाजीराजे मर्दानी आखाड्याचे पशिक्षक विजय आरवले, संदेश मुनोत, अमित काबरा, कुणाल बडजाते, शाम भुतडा, रुपेश पारख, हर्षल बोरा, पवन गुंदेचा, धनेश कोठारी, पवन झंवर, सचिन भंडारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. आभार प्रदर्शन शाम भुतडा यांनी केले.

अहिल्यानगर शहरातील जैन ओसवाल युवक संघ, बडीसाजन ओसवाल युवक संघ, माहेश्वरी युवक मंडळ, सकल राजस्थानी युवा मंच, जय आनंद महावीर युवक मंडळ, जय आनंद फाउंडेशन, दालमंडई, श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्ट, जितो अहिल्यानगर, जिंगर युवा मंच, वर्धमान युवक संघ, समस्त गुजराथी समाज, भारत भारती, जिजाऊ ग्रुप व वंदे मातरम युवा प्रतिष्ठान आदी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते

# आनंदऋषीजी नेत्रालयाने केली १ लाख नेत्र शस्त्रक्रियांची कामगिरी

**सामाजिक नेत्रसेवेतील ऐतिहासिक क्रांती**



नगर – आनंदऋषीजी नेत्रालयाने १ लाख नेत्र शस्त्रक्रिया पूर्ण करण्याची कौतुकास्पद कामगिरी बजावली आहे, अशी माहिती आनंदऋषिजी नेत्रालयाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड यांनी दिली.

ते म्हणाले, आनंदऋषीजी नेत्रालयाने १ लाख नेत्र शस्त्रक्रिया पूर्ण केल्याची घोषणा करताना अभिमान वाटतो. नेत्रालयाने समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींची नेत्र सेवा करणे या मूळ उद्दिष्टाप्रती असलेल्या अतूट बांधिलकीवर भर देत हा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केला आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सर्वसमावेशक नेत्रसेवा पुरवणे हेच आमचे ध्येय आहे. स्थापनेपासूनच नेत्रालय ना नफा ना तोटा या तत्त्वावर कार्यरत आहे. येथे जागतिक दर्जाची नेत्रसेवा परवडणाऱ्या दरात आणि सर्वांसाठी उपलब्ध आहे. पारदर्शकतेची ही बांधिलकी त्यांच्या किमतीच्या स्वरूपात दिसून येते, ज्यात आयओएल (IOLs) सारख्या खर्चाचा स्पष्ट तपशील असतो आणि पूर्ण माहितीसाठी स्टिकर्सही दिले जातात.

वैद्यकीय संचालक डॉ. अशोक महाडिक म्हणाले, १ लाख शस्त्रक्रियांचा हा टप्पा आमच्या संपूर्ण टीमच्या समर्पणाचे आणि आम्हाला सेवा देणाऱ्या समुदायाने आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे. आमचा भर नेहमीच सामाजिक नेत्रसेवेवर राहिला आहे. सर्वाधिक गरज असलेल्यांपर्यंत पोहोचणे आणि आर्थिक अडचणींमुळे किंवा भौगोलिक अडथळ्यांमुळे कोणीही मागे राहणार नाही, याची प्राधान्याने काळजी घेणे हे कर्तव्यच समजले जाते.

नेत्रालयाच्या प्रभावी प्रवासाची प्रमुख वैशिष्ट्ये – उत्कृष्ट पायाभूत सुविधा आणि कौशल्य – ५ अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर आणि १९ उच्च कुशल डॉक्टर टीमसह नेत्रालय डोळ्यांच्या अनेक प्रकारच्या समस्या हाताळण्यासाठी सज्ज आहे. कठोर प्रक्रिया आणि डब्ल्यूएचओ (WHO) मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत आनंदऋषीजी नेत्रालय सातत्याने ९८% पेक्षा जास्त यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया दर प्राप्त करते, जो जागतिक आरोग्य संस्थेच्या ८०% च्या निकषापेक्षा जास्त आहे. हे यश बारकाईने घेतलेल्या काळजी आणि कौशल्याचेच प्रतिक आहे.

नेत्रालय अहिल्यानगरसह मराठवाड्यातील ५ जिल्ह्यांमध्ये डोळे तपासणी शिबिरांचे आयोजन करून थेट ग्रामीण लोकांपर्यंत महत्त्वाच्या नेत्रसेवा पोहोचवत आहे. फेको (Phaco), रेटिना (Retina), स्क्विंट्स (Squints), बालरोग (Pediatric), ग्लॉकोमा (Glaucoma) आणि कॉर्नियल ट्रान्सप्लांट (Corneal Transplants) यासह सर्व प्रकारच्या नेत्र शस्त्रक्रिया एकाच छताखाली येथे उपलब्ध आहेत. पूर्णवेळ सर्जन असल्याने रुग्णाकडे पूर्ण लक्ष देत चांगली काळजी घेतली जाते.

गुंतागुंतीच्या केसेस यशस्वीरित्या हाताळल्या जातात. नेत्रालय अत्यंत गुंतागुंतीच्या नेत्रशस्त्रक्रिया करण्यास सदैव सज्ज असते. शस्त्रक्रियापूर्व गुंतागुंत असलेल्या २०,००० पेक्षा जास्त दोन्ही डोळ्यांनी अंध असलेल्या रुग्णांवर यशस्वीरित्या शस्त्रक्रिया येथे करण्यात आल्या आहेत.

नेत्रालयाचे २० नेत्र सेवा केंद्रांचे (व्हिजन सेंटर्स) जाळे शहरी व ग्रामीण भागात सेवांचा विस्तार करताना निर्माण केले आहे. ही केंद्रे डोळ्यांच्या विकारांची तपासणी करण्यात आणि रुग्णांना विशेष काळजी घेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. कोविड–१९ महामारीच्या आव्हानात्मक काळात, या जाळ्यांमुळे दूरच्या भागांमध्येही सतत काळजी घेणे शक्य झाले. काही केंद्रांमध्ये ऑनलाइन सल्ला सुविधा देखील उपलब्ध आहे. ज्यामुळे रुग्णांना तज्ज्ञांशी जोडले जाते.

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील शाळांमध्ये व्यापक शालेय नेत्र तपासणी कार्यक्रमांद्वारे आनंदऋषीजी नेत्रालयाने ४०,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची तपासणी केली आहे. या उपक्रमामुळे ५०० हून अधिक स्क्विंट (Squint) आणि बालरोग मोतीबिंदू शस्त्रक्रिया (Pediatric Cataract Surgery) झाल्या आहेत. १,५०० पेक्षा जास्त चष्मे वाटप करण्यात आले आहेत. ज्यामुळे असंख्य मुलांच्या जीवनाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारली आहे. गुणवत्ता आणि प्रणाली विकासासाठी मदुराईतील अरविंद नेत्रसेवा प्रणालीशी (Aravind Eye Care System) आनंदऋषीजी नेत्रालयाची संलग्नता, उत्कृष्टतेचा सततचा पाठपुरावा आणि जागतिक सर्वोत्तम पद्धतींचे पालन दर्शवते. जगातील प्रगत तंत्रज्ञानाप्रमाणे सर्व वैद्यकीय उपकरणे व शस्त्रक्रिया पध्दती नियमितपणे अद्ययावत केली जातात. ज्याचा फायदा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत होवून त्याला नवीन दृष्टी मिळू शकते.१ लाख शस्त्रक्रियांचा हा टप्पा केवळ एक आकडा नाही हे १ लाख दृष्टी परत मिळवलेल्या, नूतनीकरणीय आशा आणि सशक्त जीवनांच्या कथांचे प्रतिनिधित्व करते. आनंदऋषीजी नेत्रालय समाजातील सर्व वर्गांना स्पष्ट दृष्टी आणि उज्ज्वल भविष्य प्रदान करण्याच्या आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करत राहिल.

आनंदऋषीजी नेत्रालय ही अहिल्यानगर मधील समर्पित नेत्रसेवा संस्था आहे. जी समाजातील सर्व स्तरांना परवडणारी, उच्च–गुणवत्तेची आणि नैतिक नेत्रसेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील गरजू तसेच वंचित लोकांची नेत्रसेवा करण्यावर लक्ष केंद्रित करते, असे आनंद छाजेड व डॉ. अशोक महाडिक यांनी सांगितले.

# विनापरवाना व धोकादायक होर्डिंगवर कारवाईसाठी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण



होर्डिंगवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करताना विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी.

नगर – शहरात मोठ्या प्रमाणात असलेल्या विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंगवर कारवाई करावी व एकाच ठिकाणी १० वर्षापासून कार्यरत असलेल्या ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहिल्यानगर येथील कर्मचाऱ्यांची बदली करण्याच्या मागणीसाठी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर ३० मे रोजी उपोषण करण्यात आले. या उपोषणात छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, जिल्हा सचिव हजरत शेख, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, शाहीर कान्हू सुंबे, संदीप गायकवाड, दत्ता वामन, दीपक वर्मा, सुभाष काकडे, सुखदेव पवार आदी उपस्थित होते.

नगर शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंग उभ्या राहिल्या असून, त्याकडे महापालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेच्यावतीने करण्यात आला आहे. महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी सुरक्षा नियम धाब्यावर बसवून, विद्युत महावितरणच्या परवानगीविना अनधिकृत होर्डिंग उभारले गेले आहेत. विनापरवाना होर्डिंगच्या एजन्सीवर गुन्हा दाखल करून त्यांचा परवाना रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहिल्यानगर येथील ज्या कर्मचाऱ्यांना बदलीचा कालावधी पूर्ण झालेला असून, ते मागील दहा वर्षापासून त्याच ठिकाणी काम करत आहे. वेळोवेळी उपसंचालक क्रीडा व युवक सेवा संचलनालय यांच्याशी पत्रव्यवहार व पाठपुरावा करून प्रतिसाद मिळालेला नाही. सदर प्रकरणी तक्रारीची चौकशी करुन, त्या चौकशीचा केवल फार्स करण्यात आला आहे. चौकशी अहवाल अद्याप तक्रारदार यांना देण्यात आलेला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

१०–१० वर्षे सलग एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची जिल्हा बाहेर बदली करावी, त्यांची खातेनिहाय चौकशी करावी, २०१५–१६ मधील बोगस भरती प्रकरणी ज्या कर्मचाऱ्यांचे नावे एफआयर मध्ये आहेत त्या सर्व कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तीकेत गुन्ह्यांची नोंद तात्काळ करण्यात यावी, वरिष्ठ लिपिक व त्यांची पत्नी दोन्हीही शासनाचे नियम डावलून एचआरए भत्ता घेत असून, त्याची देखील चौकशी करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

